(तिष्ठ, तिष्ठ, तिष्ट, असे आदरपूर्वक तीन वेळा म्हणून प्रतिग्रह केला तर उभे राहतात. तेथून निगाले म्हणजे पन: त्या घरात प्रवेश करीत नाहीत. दुसऱ्या घरी जातात. तेथे अतराय झाला तर तिसऱ्या घरी न जाता परत वनात जातात. आचारांग सूत्रात वर्णिल्याप्रमाणे शेहेचाळीस दोष चौदा मल व बत्तीस अंतराय टाळून आहर मिळाल्यास हे प्राणांची रक्षा होईल इतकाच आहार ग्रहण करतात. सरस-निरस, लाभ-अलाभ याविषयी समान भाव ठेवतात. जसे साधुपुरुषाच्या सेवेपासून अनेक गुण प्राप्त होतात तद्वत असा भिक्षेपासून चारित्रशुद्धी प्राप्त होते. ही भिक्षा मुनीश्वर पाच प्रकाराचे घेत असतात. गोचरीवृत्ति, अक्षम्रक्षणवृत्ति, उदराग्निप्रशमनवृत्ति, भ्रामरीवृत्ति आणि गर्तपूर्णवृत्ति याप्रमाणे साधू पाच प्रकारचे आहार घेतात.

१) गोचरीवृत्ति - हिरवे गवत, वस्त्रालंकारानी विभूषित अशा सुंदर स्त्रीने आणून जरी गाईपुढे ठेविले तरी ती गायत्या स्त्रीकडे न पाहता आपल्या पुढील गवत खात असते, तद्वत जे साधू दाताराच्या वस्त्राभूषण सौंदर्याला न पाहता नवधाभक्ति प्रतिग्रहपूर्वक आपल्या हातात ठेवलेला ग्रास भक्षण करतात, ते त्याच्या वस्त्राभरणाकडे पाहात नाहीत. अशा प्रकारच्या साधूवृत्तीला गोचरीवृत्ति असे नांव आहे. अथवा ज्याप्रमाणे गाय अरण्यात अनेक स्थली असणारे गवत भक्षण करते, ती वनाची शोभा वगैरे पाहण्यात गुंत होत नाही तद्वत जैनसाधूही गृहस्थाच्या घरात गेले तर त्याचे घर, महाल, शय्या, आसन वगैरे पाहण्यात अथवा सुवर्ण, रुपे, कांसे, पितळ, मतीची भांडी पाडण्याकडे आपली दृष्टी ठेवीत नाहीत. आप्लाय हातात ठेवलेला ग्रास ग्रहण करण्याकडेच त्यांचे लक्ष असते. त्या घरातील परिवारजनांचे मनोहर पो,ाख अथवा स्वरूपाकडे पाहात नाहीत. सरस नीरस मिळेल तशा आहाराकडेही न पाहता गाईप्रमाणे आहार घेतात म्हणून याला गोचरीवृत्ति अथवा गवेषणावृत्ति म्हटले आहे.

२) अक्षम्रक्षणवृत्ति - ज्याप्रमाणे कोणी व्यापारी रत्नांनी लादलेला गाडा वरचेवर वंगण करून आपल्याला इच्छित अशा देशांतराला घेऊन जातो तद्वत साधूही गुणरूपी रत्नांनी भरलेला देहरूप गाडा निर्दोष असे भिक्षाभोजन देऊन आपल्याला वांछित अशा समाधिरूप पत्तनाला (शहराला) नेतात म्हणून अशा प्रकारच्या वृत्तीला अक्षम्रक्षणवृत्ति म्हटले आहे.

३) उदारग्निप्रशमवृत्ति - ज्याप्रमाणे अनेक प्रकारच्या मौल्यवान् वस्त्राभरणांनी भरलेल्या भांडारास आग लागली असता ती जशी शुद्ध वा अशुद्ध पाण्याने विझवून गृहस्थ आपल्या भांडाराचे रक्षण करतात तद्वत साधूही उदररूपी भांडारात उत्पन्न झालेल्या क्षुधातृषादिरूप

अग्नीला सरस-नीरस भोजनाने शांत करतात. अशा प्रकाच्या वृत्तीला उदराग्निप्रशमवृत्ति म्हणतात.

४) भ्रमराहारवृत्ति - जसे भुंगे फुलाला यत्किचितही बाधा न करता त्यातील गंध (वास) हरण करतात, तसे साधू देखील देताराला थोडेही न दुखविता भोजन करतात. याप्रमाणे भोजन घेणे याला भ्रमराहारवृत्ति म्हणतात.

५) गर्तपूरणवृत्ति - जसे आपल्या घरात एखादा खड्डा पडला तर तो दगडमाती घालून आपण भरू न कढ तो, त्याप्रमाणे साधू आपल्या उदररू पी खड्डा सरस-नीरस आहारांनी भरू न टाकतात. याला गर्तपूरणवृत्ति म्हणतात.

याप्रमाणे पाच वृत्तींनी साधू शुद्ध भोजन घेत असतात.

श्रावकाने आपली भोजनशुद्धी अन्याय व हिंसा उत्पन्न करणारे व्यवहार सोडून कर्मानुसार प्राप्त होईल त्यात, संतोष धारण केल्याने होते. इतरांना दु:ख न देता न्यायाने संपादन केलेल्या धनाचा गर्व, विषाद आणि दैन्य सोडून, दानाचा विभाग कढून ठेवून अन्नाचा उपभोग घ्यावा. अभक्ष्यादि सदोष भोजनाचा त्याग करू न दिवसा आपल्या भोगांतराय व लाभांतरायाच्या क्षायोपशमाप्रमाणे सरस-नीरस प्राप्त होणाऱ्या आहारातून कुटुंबाचा व दानाचा भाग कढून ठेवून भोजन करावे. या प्रकारे गृहस्थानी अति आसक्ती व लालसा यांचा त्याग केल्याने भोजनाची शुद्धी होते.

६) प्रतिष्टापनाशुद्धि- संयम धारण करणाऱ्या मुनींनी आपलया शरीरावरील नख, केश, कफ, नासिकामल, मूत्र वगैरे कोणालाही त्रास न होईल, कोणताही जीव मरण पावणार नाही, कोणाही जीवाचे परिणाम मलिन होणार नाहीत अशा जागी टाकावे. याप्रमाणे आचरण करणार्याला प्रतिष्ठापनाशुद्धि होते. गृहस्थांनी आपल्या शरीरा मल, पाणी, राख, माती, दगड, लाकडे वगैरे इतर जीवांना पीडा होणार नाही अशा ठिकाणी टाकावी. तेथे टाकताना कोणाही जीवाची विराधना होऊ नये, कोणाशीही कलह, विसंवाद होऊ नये, आपल्या शरीराला अपाय होऊ नये, दुसऱ्याला ग्लानी होऊ नये याची खबरदारी घ्यावी.

७) शयनासनशुद्धि - हे साधूचे मुख्य आचरण आहे. जेथे स्त्री, नपुंसक, चोर, मद्यपी, शिकारी वगैरे पापी लोकांचे येणे जाणे नसेल तेथेच साधूंनी राहणे योग्य आहे. जेथे शृंगारवस्त्राभरण धारण करणाऱ्या स्त्रिया राहत असतील, अथवा क्रीडा करण्याकरिता बाग तयार

केलेला असेल, जे गाणे, वजावणे वगैरे क्रिया चालत असतील अशी जागा साधु पुरुषांना राहण्यास योग्य नाही. म्हणून ते अशा स्थानाचा त्याग करून दूर राहतात. जैन साधू अकृत्रिम अशा पर्वताच्या गुहेत अथवा झाडाच्या ढोलीत, अथवा उजाड घरात, अथवा आपणाकरिताच मुद्दाम न उभारलेल्या स्थानी व शुद्ध भूमीवर शयन, आसन करतात. गृहस्थांनीही स्त्री, नपुंसक, दुष्ट, कलह, विसंवाद आणि विकथा वगैरेनी परिणामाची निर्मलात बिघडणार नाही अशा जागी शयन व आसन करावे. स्थानदोषाने परिणामातही दुर्ध्यान उत्पन्न होते व दुष्ट चिंतन होते, म्हणून गृहस्थांनी आपली आजीविका न्यायमार्गाने करून बसणे-उठणे वगैरे क्रिया निराकुल जागीच कराव्या.

८) वाक्यशुद्धि - मुनी आपल्या मुखावाटे पृथ्वीकायादि जीवांची विराधना होईल असे कठोर, निंद्य व परपीडा उत्पन्न करणारे वचन कधीही काढीत नाहीत. ते नेहमी आपल्या मुखाने व्रत, शील, संयम, तपाचाच उपदेश हित पण मित अशा मधुर मनोहर वचनांनी करतात. अशा मुनींना वाक्यशुद्धि घडते. गृहस्थानेही आपणास जितकी वाक्ये उच्चारावयाची असतील तितकी विचारपूर्वक बोलावी, लोकविरुद्ध, धर्मविरुद्ध, हिंसोत्पादक, असत्य, बहुकर्कश अशी वचने मुखावाटे कधीही उच्चारू नयेत म्हणजे त्याला वाक्यशुद्धि घडते. याप्रमाणे या अष्टशुद्धी संयमी पुरुषाला करण्यायोग्य आहेत. याचे गृहस्थाने पण चिंतन करून ह्या आपणास घडाव्यात अशी भावना ठेवावी, म्हणजे तो विशेष पापात लिप्त न होता धर्मवृद्धीचे चिंतन करण्यास अधिक समर्थ होईल.

## तपोभावना

तपभावनेचे पण गृहस्थांनी चिंतन करणे योग्य आहे. य्दपि तप हे मुख्यत्वे करून मुनीश्वरांनी करावे असे आहे, तथापि गृहस्थानेही याचा अभ्यास करीत जावे म्हणजे रोग वगैरे प्राप्त झाले असता तो व्रतापासून चलायमान होत नाही. इंद्रियावरील नियंत्रणामुळे वृद्धापकाळी बुद्धी चंचल होत नाही. आहारपानाविषयी होणारी आकुलता सहन केल्याने संतोषवृत्ती प्रकट होऊन दैन्य नाहीसे होते व परलोकी स्वर्गाची प्राप्ती होते, म्हणून तप करणे योग्य आहे. हे तप बाह्य व अभ्यन्तर असे दोन प्रकारचे आहे. बाह्य तपाचे अनशन, अवमोदर्य, वृत्तिपरिसंख्यान, रसपरित्याग, विविक्तशय्यासन आणि कायक्लेश असे सहा भेद आहेत.

१) अनशन - अशन म्हणजे भोजन. त्याचा त्याग करणे यास अनशन म्हणतात. हे तप जो दृष्टफलाची अपेक्षा न करता करील त्यास लाभणारे आहे. इहलोकी आपली कीर्ती व्हावी म्हणून

प्रसिद्धी व्हावी म्हणून, लोकांनी आपणास नमस्कार करावा म्हणून, मंत्रसाधन व्हावे म्हणून, ऋद्धी व संपत्ती प्राप्त व्हावी म्हणून, शत्रूंचा नाश होऊन परलोकी वैभव प्राप्त व्हावे म्हणून क,ायाने अथवा वैराने दु:खित होऊन आपला घात व्हावा या इच्चेने जे केले जाते ते खरे अनशन तप नव्हे. ते तप संसारपरिभ्रमणाचे कारण आहे. इंद्रियांची विषयावरील प्रीती कमी व्हावी, षट्काय जीवांचे रक्षण व्हावे, रागभाव कमी व्हावा, निद्रा जिंकली जावी, कर्माची निर्जरा व्हावी, ध्यानाची सिद्धी व्हावी, देहाचा सुखीपणा नाहीसा व्हावा म्हणून जे उपवास वगैरे करावयाचे त्यासच खरे तप म्हणतात. हे तप दोन प्रकारचे आहे. एक कालमर्यादेचे व दुसरे यावज्जीव. दिवसातून दोन वेळा भोजन करण्याचा प्रघात आहे. त्यातून एक वेळा भोजन करणे व एक वेळा त्याग करणे याला तप म्हटले आहे. पहिल्या दिवशी एक वेला जेवून दुसऱ्या वेळच्या जेवणाचा त्याग, दुसऱ्या दिवसाच्या दोन वेला जेवण्याचा त्याग व पारण्याच्या दिवशी एक वेळ भोजन करून एक भोजनाचा त्याग याप्रमाणे चार भोजनाचा त्याग करणे याला प्रोषधोपवास म्हणतात. सहा भोजनांच्या त्यागाला बेला म्हणतात. आठ भोजनांचा त्याग करणे याला तेला म्हणतात. दहा भोजनांचा त्याग करणे याला चौला म्हणावे. याप्रमाणे कालाची ज्यात मर्यादा असते त्यास कालमर्यादारूप अनशन म्हमतात. भगवंतांनी इंद्रियांचा उपशम व्हावा म्हणून उपवास करण्याससांगितले आहे, म्हणून इंद्रियांना जिंकणारे मुनी भोजन करीत असून उपवासी म्हणविले जाता. पण जे उपवास करीत असूनही इंद्रियांना जिंकीत नाहीत, अनेक प्रकारचे आरंभ करतात,कषाय-प्रवृत्ती करतात त्यांचे अनशन तप निष्फल होते. ते तप कर्माची निर्जरा करू शकत नाही. याप्रमाणे अनशन तपाचे स्वरूप आहे. गृहस्थांनी ज्यायोगे आपले वात, पित्त, कफादि विकार वृद्धिगत होणार नाहीत, रोगांचाउपशम होऊन उत्साह वाढत जाईल त्याप्रमणे व आपले परिणाम वरचेवर शुद्ध व्हावेत म्हणून देशकालानुकूल आहारपानाची योग्यता जाणून, कुटुंबातील माणसांच्या सहाय्यांचे बलाबल पाहून, आपल्या संहननाप्रमाणे शरीरात बिघाड होणार नाही अशा रीतीने शक्ति त्यनुसार अनशन तपाचा अंगीकार करावा.

२) अवमोदर्य - अवम-कमी उदर ज्यात राहील त्यास अवमोदर्य म्हणतात. म्हणजे आपण नेहमी जितके अनन ग्रहण करतो त्याहून कमी ग्रहण करावयाचे हेअवमोदर्य होय. यापासून इंद्रियांचासंयम होतो. भोजनाच्या आसक्तीचा अभाव होतो. अल्पाहारापासून वात, पित्, कफादि विकारांचा प्रकोप होत नाही. रोगाचा उपशम होतो. आळस व झोप कमी होते. स्वाध्या, सामायिक, कायोत्सर्ग, ध्यान वगैरे करण्यात कष्ट होत नाहीत. सुकाने आवश्यक क्रिया करता येतात. अवमोदर्य करण्याने उपवासापासून होणारी उष्णता व खेद होत नाहीत. पुढे क्रमाने उपवासही सहज होऊ शकतात. आकंठ भोजन करणाऱ्याला आवश्यक क्रिया, ध्यान,

कायोत्सर्गादि सुखाने होतनाहीत. त्याचा आळस, निद्रा वाढ ते, तहान लागते, उष्णता वाढून रोग वाढ तात. इंद्रियांची लालसा कमी होण्याकरिता व मनाला प्रतिबंध करण्याकरिता ज्ञानी मुनी अर्द्धभोजन, पावभोजन, दोन घास व अखेर घासापर्यन्त कमी, असे अवमोदर्याचे भेद करतात. पण जर ते मिष्ट भोजनाकरिता अथवा कीर्तीकरिता अल्पभोजन करीत असतील तर त्याला अवमोदर्य म्हणता येणार नाही. अवमोदर्य हे भोजनाची लालसा कमी करण्यातरिता आहे. गृहस्थ श्रावकानेही अंतराय कर्माच्या क्षयोपशमाप्रमाणे प्राप्त होणाऱ्या भोजनात संतोष मानून भोजनाची लालसा सोडून इच्छेचा निरोध करण्याकरिता अवमोदर्य तप करावे.

३) वृत्तिपरिसंख्यान - हेतप फक्त मनीश्वर्रानाच घडते. मुनीश्वर भोजनास निघताना प्रतिज्ञा करतात की, आज एक, दोन, चार, पाच अथवा सातघरी जावयाचे. जर सरळ मार्गात असलेल्या घरी आहार मिळाला तर घ्यावयाचा, वक्रमार्गाने जाऊन अमुक या अमुक याने दिला तर घ्यावयाचा. तसेच त्याने अमुक पात्रातून अमुक या तऱ्हेनेच दिला तर ग्रहण करावयाचा, इतर प्रकाराने मिळाला तर घ्यावयाचा नाही. याप्रमाणे अनेक कठिण मर्यादा करून ते आहारासाठी निघतात. अशा प्रकारच्या प्रतिज्ञेला वृत्तिपरिसंख्यान तप असे म्हटले आहे. हे दुर्धर तप मुनीश्वरांनाच घडते. इतर गृहस्थांना हे धारण करणे अशक्य आहे. गृहस्थाला जर हे तप धारण करावे असे वाटले, तर त्याने प्रथमत: वीतराग गुरुच्या प्रसादाने अशी प्रतिज्ञा करावी. उज्ज्वल जिनधर्माला धारण करीन, धर्माचा घात होईल अशा तऱ्हेने वागणार नाही, ज्यात माझजे ज्ञान, श्रद्धान, तप, व३त, नष्ट होील अशा तऱ्हेने आजीविका पण करणार नाही,पुष्कळशी हिंसा, असत्य व कपट ज्यात भरेलेले असेल अशी नोकरी करणार नाही, खोटे व पाप उत्पन्न होणारे व्यवहार करणार नाही. प्रामाणिकपणानेच व्यापार करीन. आरंभरहित, कपटरहित, असत्यरहित उपजीविकेचेच अवलंबन करीन. अन्यायाने उपजीविका करणार नाही. याप्रमाणे आपल्या आजीविकेचा नियम करावा. तसेच एवढे धन, एवढा परिग्रह, इतकी वस्त्रे यांचाच भोगोपभोग घेईन. रोगादि प्राप्त झाले तर इतकी औषधे घेईन, याशिवाय दुसरी औषधे भक्षण करणार नाही( आपल्याच मुखाने सांगून मी काही करविणार नाही व काही आणविणार नाही( अथवा आज आपल्या घरात जेवणाच्या वेळा पात्रात पहिल्यांदाच जे ठेवतील तेवढेच भक्षण करीन, फिरून मागणार नाही. याप्रमाणे इच्छा रोकण्याकरिता गृहस्थाने प्रतिज्ञा कराव्या म्हणजे त्याला हे व्रत घडल्यासारखे होते.

४) रसपरित्याग - दूध, दही, तूप, गूळ, मी आणि तेल हे सहा रस आहेत. त्यातून जिह्लेची व इतर इंद्रियांची इच्छा व मनाची लोलुपता नाहीशी करण्याकरिता, कामाला जिंकण्याकरिता, निद्रा कमी होण्याकरिता व संयम घडावा म्हणून काही रसांचा तयाग करावा.

कधी एका रसाचा तर कधी दोन, तीन, तर कधी सहाही रसांचा त्याग करणे यला रसपरित्याग म्हणतात. संसारी जीवाला गोड भक्षण करण्याची आवड असते, त्यामुळे ते प्रसंगी लाजलज्जा सोडून अभक्ष्यभक्षण देखील करतात, भोजनाच्या लोलपतेने व्रत, तपश्चरण तर बिघडवितातच पण शूद्रादिक जे अयोग्य कुलात जन्मलेले आहेत त्यांच्या येथे देखील जाऊन जेवतात. भुकेने दीन होतात. गोड खाण्याकरिता तंटे करण्यास तयार होता. प्रसंगी त्यासाठी जीव देखील देतात. रसलोलुपी लोक बहुतेक अन्नाच्या लोभामुळे भ्रष्ट होतात. कोणत्याही उत्तम पुरुषाला स्वादिष्ट भोजनातइतकी लोलुपता असत नाही. ते प्रथमपासूनच आपल्या घरात नाना प्रकारच्या घृतशर्करेने बनविलेल्या मिष्टपदार्थावरील लालसा कमी करू न खारट, सपक असे कोरडे किंवा सचिक्कण वगैरे जसे आपल्या अवस्थानुसार प्राप्त होईल त्यात संतोष मानून भक्षण करीत असतात. रसलंपटता दोन्ही लोकांना भ्रष्ट करणारी आहे, म्हणून ती नाहीशी करण्याकरिता, इंद्रियांना वश करण्याकरिता, उत्कृष्ट संवर व निर्जरकरिता, दीनतेच्या नाशार्थ व संतोषवृत्ती धारण करता यावी म्हणून रसपरित्याग नामक तपश्चरण करणे योग्य आहे.

५) विविक्तशय्यासन - शून्य म्हमजे जेथे कोणीही राहात नाही अशा घरात, एकांत जागी, विकलत्रयाची बाधा होणार नाही अशा ठिकाणी, स्त्री, नपुसक वगैरे असंयमी लोकांचे येणे जाणे नसेल अशा जागी, पर्वताच्या गुहेत, अरण्यात, ध्यान, अध्ययन, शयन, आसन करणे याला विविक्तशय्यासन तप म्हणतात. एकांत स्थली निवास करणाऱ्या साधूंना हिंसा, मम्तव, विकथा आणि कामविकार हे उत्पन्न होत नाहीत. त्यामुळे त्यांना ध्यानाची सिद्धी होते. दुसऱ्या कोणाचा संगम घडला, तर त्याशी बोलणे भाग पडते. बोलण्यापासून मनात संकल्प उत्पन्न होतात. संकल्प उत्पन्न झाले म्हणजे ध्यान चलायमान होते व रागभावाची वृद्धी होते. म्हणून संयमी मुनी एकांत जागीच शयन आसन करीत असतात. गृहस्थानेही धर्मसाधन करावयाचे असल्यास पापाचीभीती बाळगून आपली उपजीविकेची कार्ये न्यायपूर्वक करावी. आरंभादि कार्यापासून पाप कमी लागेल अशा रीतीने स्नानभोजनादिक कार्ये सावधगिरीने करावी. एकांत जागी आपल्या घरात अथवा मंदिरात अथवा धर्मशाळेत अथवा चैत्यालयात, सहधर्मी लोकांच्या संगतीत धर्मचर्या, स्वाध्याय, जिनागमपठन, पाठन, व्याख्यान, जिनागमाचे श्रवण व पंच नमस्कार मंत्राचे स्मरण करीत आपला दिवस व रात्र पूर्ण करावी. स्त्रीकथा, राजकथा, भोजनकथा, देशकथा करणअयात शय्यासनाचा त्याग करावा. म्हणजे गृहस्थालाही हे विविक्तशय्यासन तप घडते व ते त्याच्या कर्माच्या निर्जरेला कारण होते.

६) कायक्लेश - हेमुनीचे विशेष तपश्चरण आहे. एका आसनावर बसावयाचे, एकाच कुशीवर निजावयाचे, मौन धारण करावयाचे, कडक उन्हाळ्यात पर्वताच्या शिखरावरील दगडावर

सूर्याकडे तोंड करू न कार्योत्सर्ग धारण करू न सूर्याचा भयंकर आताप व अग्नीसारख्या तप्तायमान वायूच्या लहरींनी होणाऱ्या वेदना सहन करावयाच्या व अशा वेदना सहन करीत असतानाही बारा भावनांचे चिंतन करीत धर्मद्यानामध्ये परिणाम स्थिर ठेवावयाचे. परिणामात यत्किंचितही क्लेश उत्पन्न होऊ द्यावयाचा नाही. याचप्रमाणे पावसाळ्यात झाडाखाली योग धारण करू न, काळोखाने व्यापून गेलेल्या भयानक रात्रीच्या वेळी अखंड मुसलसदृश पावसाच्या सरींनी व मेघांच्या गर्जनेने आकाश आणि पृथ्वी जणु जलमयच झाली आहे की काय असा भास होत असताना, उंच अशा पर्वतावरू न खाली पडणाऱ्या नदीप्रवाहाने भयंकर कोलाहल माजविला असताना, वृक्षावर पुष्कळ पाऊस पडल्यामुळे त्यातून एकसारखी मोठी धार अंगावर पडत असताना, विजेच्या चकाकीने व घोर कडकडाटाने जणु वज्राघात होतो की काय असा भास होत असतानाही मुनीश्वर ती महन करीत राहून धर्मध्यानात व शुक्लध्यानात तल्लीन झालेले असतात. धन्य आहे त्यांचे( याचप्रमाणे हिवाळ्यात नदीच्या काठी व वाळवंटात उघड्या अंगावर र्फ पडत असणे, अतिशय थंडगार वारा सुटलेला असणे, त्यावेली दु:ख न मानता धर्मध्यानात रात्र काढणे, तसेच दुष्ट लोकांनी दिलेला भयंकर उपद्रव सहन करू न समभाव कायम ठेवणे हे सर्व कायक्लेश तप आहे. हे करण्याचा असा उद्देश असतो की, पारतंत्र्यामुले दु:क प्राप्त झाले तरी आपण परिणाम, उद्दिष्ट कार्यापासून चळू नयेते( शरीरापासून उत्पन्न होणाऱ्या सुखाची अभिलाषा नाहीशी व्हावी( रोग प्राप्त झाला असता चित्त चंचलहोऊ नये, भीती जिंकावी आणि परीषह सहनकरू न कर्माची निर्जराकरावी. गृहस्थांना असले तप सहन करणे घडणार नाही. असेघोर तपश्चरण दिगंबरसाधूच करण्यास समर्थ आहेत. गृहस्थाने आपण होऊन मुद्दाम कायक्लेश करू नये.पण सामायिकादि क्रिया करीत असता काही परीषह प्राप्त झाले तर आपले चित्त चळू देऊ नये. आपण सावधगिरीने वागत असूनही जर कर्मोदयाने शीतज्वर, दाहज्वर,वात, शूल वगैरे रोग प्राप्त होतील, अथवा दुष्ट, धर्मद्रोही, म्लेंच्छादिक येऊन उपसर्ग करू लागतील, अथवा बंदीगृहात कोंडून हाणमार करतील तर गृहस्थांनी मुनीच्या कायक्लेश तपाची भावना चिंतून साम्यभाव धारण करावा. त्यावेळी घाबरू नये, दारिद्र्यामुळे क्षुधातृषादि शीत, उष्ण वेदना कर्मोदयाने प्राप्त झाल्या तरीही धीर सोडू नये. त्यावेळी धर्माला शरण जाऊन सर्व दु:ख सहन करावे. यालाच कायक्लेश असे नांव आहे. मुनी असा कायक्लेश मोठ्या उत्साहाने सहन करतातच. त्यासारखे आम्ही कायक्लेश करू शकत नाही. तरी पण असाताकर्माच्या उदयाने दु:ख प्राप्त झाले व त्या दु:खाची फार भीती वाटली तरी, ते दु:ख भोगावे लागतेच. पण याहीपेक्षा पुष्कल पटीने जास्त असा पुढील दु:खाचा बंध होईल. म्हणून जिवनचनावर भरवसा ठेवून कर्मोदयाच्या प्रसंगी धैर्य धारण करणे हेच श्रेष्ठ आहे. गृहस्थाला ज्यावेळी अंतरायकर्माचा उदय प्राप्त होतो, त्यावेळी त्याला पोटभर अन्न मिळत नाही. मग तूप, साखर कोठून मिळणार(

म्हणून कर्मानुसार जे थोडे बहुत प्राप्त होईल त्यात संतोष मानून रहावे. लोकांचे वैभव पाहून आपणाला तसे प्राप्त व्हावे अशी इच्छा करू नये. संतोष मानून राहावे. लोकांचे वैभव पाहून आपणाला तसे प्राप्त व्हावे अशी इच्छा करू नये. साम्यभाव ठेवावा, म्हणजे सहज रीतीने कायक्लेश तप घडते व त्यामुले कर्माची निर्जरा होते.

याप्रमाणे सहा प्रकारचे बाह्यतप वर्णिले. हे इतरांना प्रत्यक्ष केलेले दिसून येते, अथवा बाह्य जे भोजन वगैरे यांचा त्याग केल्यापासून घडते, अथवा अन्यधर्मीही कोणी याला समजू शकतात म्हणून या तपाला बाह्यतप असे म्हटले आहे. पुष्कळसा अग्नी गोळा केला असता तो गवत वगैरे जाळून टाकतो त्याप्रमाणे हे पूर्वसंचिताला दुग्ध करणारे आहे, म्हणून याला तप अशी संज्ञा दिली आहे. अथवा इंद्रियांना त्रास देऊन त्यांना विषयादिकामध्ये रममाण होऊ देत नाही म्हणून तप म्हटले आहे. सुवर्णपाषाणाला तापविले असता तो जसा आपला मल टाकून शुद्ध सुवर्णमय बनतो, तद्वत आत्मा हीतपाच्या प्रभावाने कर्ममलरहित होतो म्हणून भगवंतांनी याला तप असे म्हटले आहे. यापुढे प्रायश्चित, विनय वैयावृत्य, स्वाध्याय, व्युत्सर्ग आणि ध्यान, असेअंतरंगतपाचे सहा भेद आहेत. यात प्रायश्चित्ताचे नऊ, संक्यात व असंख्यात भेद आहेत. त्यापैकी पिहिल्या नऊ आलोचना वगैरेच वर्णन करू लागलो तर ग्रंथविस्तार होईल म्हणून ते संक्षेपात सांगतो.

१) प्रायश्चित - धर्मात्मा पुरुषाने आपल्या व्रतधर्मात दोष लागेल असे स्वत: आचरण करू नये, दुसऱ्याकडून करवू नये. कोणी करील त्याला मनवचनकायेने बरे असे म्हणू नये. कदाचित प्रमादामुले दोष लागला तर साधूजवळ जाऊन सरळ परिणामाने दहा दोष टाकून, निवेदन करून आलोचना करावी व गुरूंनी दिलेले प्रायश्चित पूर्ण श्रद्धेने आदरपूर्वकधारण करावे. गुरूंनी मला प्रायश्चित जबर दिले अथवा थोडे दिले अशी मनात शंका आणू नये. प्रमादाने एक वेळा दोष घडला असता तो प्रायश्चित घेऊन दूर करावा. पुढे आपेल शतश: कोणी तुकडे तुकडे केले तरी दोष लागू देणारनाही अशी खबरदारी ठेवणाऱ्याचे प्रायश्चित घेणे सफल होते. प्रयश्चित्त हे अनेक गुण धारण करणारा, सिद्धांताचे रसह्य जाणणारा, अतिशय शांत ज्याचे मन आहे असा, अपरिस्रावी (दुसऱ्याचे दोष न सांगणारा) गुणाला धारण करणारा, तपलेल्या गोळ्यावरील पाणी जसे पुन: बाहेर दिसत नाही त्याप्रमाणे शिष्याने प्रगट केलेले दोष कधीही प्रगट न करणारा( देशकालाला जाणणारा, एकांती बसलेला व पूर्वी वर्णिलेल्या आचार्यांच्याअनेक गुणांना धारण करणारा जो गुरु असेल त्याजवळ जाऊन घ्यावे( व हात जोडून, मोठ्या विनयाने बालकाप्रमाणे सरलचित्त होऊन, आत्मनिंदा करीत आलोचना करावी. ज्याप्रमाणे रक्ताने भरलेल्या कापडावरील डाग रक्ताने धुतल्याने जात नाहीत, अथवाचिखलाने चिखल

धुतला जात नाही, तसे ज्या गुरू त दोष भरलेले असतील ते साधू शिष्याला निर्दोष करू शकत नाहीत. मूर्ख वैद्य रोग्याचा प्राण घेतो, त्याप्रमाणे अज्ञानीगुरु शिष्याला संसारसमुद्रात बुडवितो. निर्दोषगुरू च प्रायश्चित्त देऊन शुद्ध करण्यास समर्थ आहे संयमी पुरुष एकांती आलोचना करतात. आर्यिका वगैरेनी, उघड्या जागी एक गुरु, दोन आर्यिका, एकगणिनी अथवा जिला दोष लागला असेल ती असे तिघे असताना आलोचना करावी( जर त्यांनी लज्जेने व तिरस्कार होईल अथवा प्रायश्चित्त जबर भोगावे लागेल या भीतीने, अथवाअभिमानाने आपले दोष सांगितले नाही, तर त्यांना नफातोट्याचा हिशेब न पाहणाऱ्या व्यापाऱ्याप्रमाणे कर्मरू प ऋणामुळे भ्रष्ट व्हावे लागेल. दोषांची आलोचना न करता भयंकर तपश्चरण केले तरी त्यापासून वांछितफलाची प्राप्ती होणार नाही. आलोचना केली व गुरूं नी दिलेले प्रायश्चित घेतले नाही, तर वैद्याने दिलेल्या औषधी भक्षण न करणाऱ्या रोग्याप्रमाणे तो शुद्ध होणार नाही. अथवा नांगर मारू न माफ न केलेल्या जमिनीत जसे धान्य उत्पन्न होत नाही अथवा साफ न केलेल्या दर्पणात रू प स्वच्छ दिसत नाही त्याप्रमाणे चित्ताची शुद्धता झाल्याखेरीज आत्म्यात चारित्राची उज्ज्वलता भासत नाही. कलिकालाच्या प्रभावाने प्रायश्चित देणारे निर्दोष गुरू दिसत नाहीत. जे स्वत:च अनेक पापांनी लिप्त आहेत ते दुसऱ्याला कसे शुद्ध करणार( रक्ताने रक्त कसे धुतले जाईल( आत्मानुशासन ग्रंथात म्हटले आहे-

कलौ दंडो नीति: स च नृपतिभिस्ते नृपतयो।

नयन्त्यर्थार्थं तं न च धनमदो(स्त्याश्रमवताम।।

नतानामाचार्या नहि नतिरता: साधुचरिता:।

तपस्तेषु श्रीमन्मणय इव जाता: प्रविरला:।।१४९।।

अर्थ - कलिकालात नीतिमार्ग हा दंडावर अवलंबून आहे. दंडाची भीती असल्याशिवाय कोणी ही स्वयं न्यायमार्गाकडे प्रवृत्त होत नाही. दंड देण्यास फक्त राजाचा समर्थ आहे. राजासारख्या बलिष्ठ पुरुषाशिवाय इतर जे सहधर्मी अथवा वृद्ध अथवा समाज यापैकी कोणी दंड देतात. निर्धनाला दंडच करीत नाहीत. आश्रमात राहणाऱ्या संन्याशाजवळ धन कोठले( म्हणून संयम ग्रहण करू न कुमार्गाने चालणाऱ्याला राजा दंड करीत नाही. त्यांना आचार्यांनी दंड द्यावयास पाहिजे. सध्या आचार्य शिष्यावर प्रीती करतात व जे आपणास शरण येतील त्यांना दंड करीत नाहीत. आपला संपद्रदाय वाढविण्याकरिता जो त्यांना नमस्कार करल त्याला ते आपला समजून शिक्षा देत नाहीत. यामुळे त्यांचे शिष्य शास्त्रविरुद्ध आचरण करू लागतात. याकारणांनी

या कालात तपस्वी लोकांतही सत्यनिष्ठुर असे साधू थोडे दिसून येतात.निव्वळ ढोंगी लोकांचाच भरणा दिसून येतो. सारांश, प्रायश्चित्त घेतल्यापासून जीवाचे परमकल्याण होणार आहे. गृहस्थाने जिनप्रतिमेच्या समोर उभे राहून आपल्या अपराधाची आलोचना करावी व पुन:ते अपराध घडणार नाही अशी खबरदारी घ्यावी म्हणजे गृहस्थास प्रायश्चित्त घडते.

२) विनय - याचे  दर्शनविनय, ज्ञानविनय, चारित्रविनय, तपविनय आणि उपचारविनय असे पाच भेद आहेत. पदार्थाचे श्रद्धान करीत असता शंका वगैरे जे आठ दोष आहेत ते मुळीच उत्पन्न न होणे याला दर्शनविनय म्हणतात. सम्यग्दर्शनाला योग्य परिणाम होण्यात हर्ष वाटणे अथवा सम्यक्त्व शुद्ध घडावे म्हणून नेहमी उद्यम करीत राहणे, सम्यग्दृष्टी पुरुषाची सोबत घडावी अशी नेहमी इच्छा ठेवमे, मिथ्याधर्माची प्रशंसा न करणे, मिथ्यादृष्टीच्या तपाची, दानाची, ज्ञानाची प्रशंसा न करणे व वीतराग प्रभूंनी सांगितले ते प्रमाण आहे अशी बुद्धी असणे या सर्वांना दर्शनविनय म्हणतात. यात मिथ्यादृष्टीच्या तपाची, ज्ञानाची, आचरणाची प्रशंसा करू नये म्हणून सांगितले आहे. त्याचे कारण असे की, मिथ्यादृष्टीच्या आचरणापासून इहपरलोकी कीर्ती, प्रसिद्धी, विषयसुख, धनसंपदेची इच्छा हेच उत्पन्न होणार. त्याने आत्मप्राप्ती कशी होणार( म्हणून ते बंधाला कारण असल्याने प्रमाण नाही. याकरिता त्यांची प्रशंसा वगैरे करू नये.

ज्ञानविनयाचे लक्षण असे आहे की, आळस टाकून, विक्षेप सोडून व विषयकषायरूपी मल नाहीसे करून शुद्ध मनाने, देशकालाच्या विशुद्धेतेचे चातुर्य असलेल्या पुरुषाने, मोठ्या सन्मानाने आपल्या शक्त्यनुरूप तपश्चरण करून, वीतराग सर्वज्ञांनी प्ररूपण केलेल्या परमागमाचे ज्ञान ग्रहण करण्याकरिता अभ्यास व चिंतन करीत राहणे याला ज्ञानविनय म्हणतात. ज्ञानाचा अभ्यास करणे यातच जीवाचे कल्याण आहे. ज्ञानाशिवाय मनुष्य पशूसारखा आहे. मनुष्याला मनुष्यत्व ज्ञानाभ्यासाने येते. कामसेवन, अन्नभक्षण, इंद्रियविषय हे तर पशूलाही आहेतच. ज्ञानविनय धारण करणारा नेहमी सम्यग्ज्ञानाचीच इच्छा करीत असतो.

ज्ञान व दर्शन ज्या पुरुषाच्या ठायी असते त्याला पंचाचाराचे वर्णन ऐकताच सर्व शरीरावर रोमांच उभे राहून अंतरंगात भक्ती प्रगट होते. त्यायोगे विषयकषायांचा निग्रह होऊन शांत परिणाम होतात. तेव्हा तो नम्र मस्तक करून चारित्र धारण करण्यास तयार होतो. हा चारित्रविनय होय.

संसारातील दु:ख नाहीसे करणारे, आत्म्याला निर्बाध सुख प्राप्त करून देणारे, विषयकषायदिक रोगांचा उपद्रव जिंकणारे एक तपच समर्थ आहे व त्याला शरण गेले पाहिजे, असा विचार ज्याच्या मनात येतो त्याला तपविनय घडतो. तपस्वींना उच्च व सर्वोत्कृष्ट समजून त्यांची सेवा, भक्ती, वैयावृत्त्य, स्तुती वगैरे करणे हाही तपविनयच आहे. आपल्याश्कीतप्रमाणे इंद्रियांचा निग्रह करून देशकालानुसार अनशनादिक तप करण्यास प्रवृत्त होणे, याचाही यात अंतर्भाव होतो.

उपचारविनयाचे स्वरूप असे आहे की, आचार्यादिक पूज्य पुरुषांना पाहताच उठून उभे राहणे, गुरूच्या सन्मुख सात पाउले चालून जाणे, त्यांना मस्तक नमविणे, हात जोडणे, त्यांना पुढे करून आपण मागून चालणे, ते बसल्यानंतर आपण बसणे, नमस्कार करून रत्नत्रयाचे कुशल विचारणे, त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागणे, पठन, पाठन, तपश्चरण, आतापनयोग व सिद्धांताचा अभ्यास करणे, विहार करणे, वंदना करण्याकरिता क्षेत्रांतरी गमन करणे वगैरे सर्व क्रिया गुरूंना विचारून करणे, गुरु समक्ष असताना आपण खाली बसणे हा सर्व उपचारविनय आहे.ह्या क्रिया प्रत्यक्ष गुरु असताना करावयाच्या. पण जर गुरु वगैरे पूज्य पुरुष परोक्ष असले तर मनवचनकायेची शुद्धी करून त्यांना नमस्कार करणे, हात जोडणे, त्यांच्या गुणांचे स्मरण करणे, त्यांनी केलेली आज्ञा पाळणे हा सर्व उपचारविनय आहे. याच्या प्रभावाने सम्यग्दर्शनाचा लाभ होतो, अनेक विद्या सिद्ध होतात, मदाचा अभाव होतो, आचाराची उज्ज्वलात होते, सम्यक् आराधना घडते, कीर्ती निर्मल होते व कर्माची निर्जराही होते. याशिवाय इतरधर्मी लोकांचा व मंदज्ञानी जीवांचाही यथायोग्य विनय करावा. मिथ्यादृष्टी असला तरी त्याचाही तिरस्कार करू नये. त्याशी मिष्टभाषण मोठ्या आदराने संतोषहोईलसे बोलावे. त्याचे दु:ख नाहीसे होईल अशी वाणी मुखावाटे उच्चारावी. उद्धट वर्तनाने दोन्ही लोक बिघडतात. उपचारविनय मनवनचकायेच्या मार्गांनी अनेक प्रकारचा आहे. गुरूचे अथवा सम्यग्दर्शनादि गुण धारकांचे शय्यासन स्वच्छ करणे, त्यांच्याहून खाली बसणे, निजणे, त्यांना सोसेल अशा बेताने पादसंमर्दन करणे, त्यांना दु:ख प्राप्त झाले, रोग प्राप्त झाला तर त्यांची सेवा करून आपला जन्म सफल मानणे, त्यापुढे न थुंकणे, आळस न घेणे, ढेकर अथवा जांभई न घेणे, बोटे न मोडणे, हातपाय न पसरणे, टाळी न वाजविणे, अंग,भुवया याचे वेडेवाकडे विकार न करणे, शरीर सुशोभित न करणे वगैरे क्रियांचाही विनयात अंतर्भाव होतो. विनयी पुरुष आपण उच्च स्थानावर बसून संयमी पुरुषांना वंदन करीत नाहीत. जेथेसंयमी असतील तेथे जाऊन नमस्कार करतात. संयमी येतातसे पाहताच आसनावरून उठून उभे राहातात. गुरूची आज्ञा आम्ही धारण करू तर आम्ही पुण्यवान बनू अशी त्यांची भावना असते. या उलट उद्धट पुरुषाला व्रत, संयम, विद्या, शील वगैरे

असूनही ती सर्व निष्फल होतात. विनयाच्या प्रभावाने क्रोध, मान, वेरादिक सर्व दोष नाहीसे होतात तसेच संसारासंबंधी लक्ष्मी, सौभाग्य, कीर्ती, मित्रता, गुणग्रहण,सरलता, मान्यता, कृतज्ञता वगैरे गुणही नाहीसे होतात, म्हणून साधू व गृहस्थ या दोघांनाही संपूर्ण धर्माचे मूळ विनय धारण करणे योग्य आहे.

३) वैयावृत्त्य - म्हणजे सेवा. ही ज्यांना गुणावर प्रीती आणि धर्मावर श्रद्धा, धर्मात्मा पुरुषावर वात्सल्य, निर्विचिकित्सा वगैरे गुण असतील त्यांनाच घडते. कृतघ्नाला आचार्यादिकांचे वैयावृत्त्य करावे असा विचार मनात येत नाही. दहा प्रकारच्या साधूंचे वैयावृत्त्य करावे असे आगमात सांगितले आहे. ते दहा प्रकारचे साधु-आचार्य, उपाध्याय, तपस्वी, शैक्ष्य, ग्लान, गण,कुल, संघ,साधु आणि मनोज्ञ होत. त्यातून जे सम्यग्ज्ञानादिक गुणांना व स्वर्गमोक्षाचे सुख हेच कोणी एक अमृत त्याचे बीज जे व्रत संयम-तपादिकांना स्वहितार्थ धारण करतात त्यांना आचार्य म्हणतात. अशा आचार्यांची आपल्या शरीराने व इतर क्षेत्र शय्याआसनादिकांनी सेवा करणे याला आचार्य वैयावृत्ता म्हणतात. आचार्याचे वैयावृत्त्य करणे म्हणजे परंपरेने सर्व संघाचे वैयावृत्त्य करण्यासारखे आहे. कारण सर्व संघाचे अस्तित्व आचार्याच्या प्रभावावरच अवलंबून असते. जिनवरांनी वर्णिलेल्या व्रत, शील, तप, संयम, धारण करणाऱ्या मुनीजवळ जाऊन जे परमागमाचे अध्ययन व पठन करतात ते उपाध्याय होत. मोठमोठी अनशनादिक तपश्चरणे जे करतात जे तपस्वी, श्रुतज्ञानाच्या शिक्षणात आणि व्रतशीलांच्या भावनेत जे निरंतर तत्पर असतात ते शैक्ष्य, रोगादिकांनी ज्याचे शरीर पीडित झाले असेल ते ग्लान, वृद्ध मुनींचा समूह तो गण, दीक्षा देणाऱ्या आचार्यांचा जो शिष्यसमूह तो कुल, चार प्रकारच्या मुनीश्वरांचा समुदाय तो संघ, पुष्कळ वर्षापासून दीक्षा घेतलेला तो साधू, लोकात पंडित म्हणून ज्याची मान्यता असेल, मोठा वक्ता व कुलीन म्हणून जो प्रसिद्ध असेल तो मनोज्ञ होय. याप्रमाणे ज्यांच्या योगाने धर्माचे गौरव वाढते, अशा प्रकारच्या दशविध मुनींच्या शरीरात काही रोग उत्पन्न होईल, त्याजवर संकट येईल अथवा त्यांच्या परिणामात मिथ्यात्वाचे भाव उत्पन्न होईल तर यथाक्रम त्यांना भोजन, पात्र, वसतिका, संस्तरण, धर्मोपदेश वगैरे देऊन श्रद्धान दृढ करणे, पुस्तक, पिंछिकमंडलु वगैरे धर्मोपकरणाचे दान देणे, प्रसंगी धैर्य वउपदेश देऊन संतोषवृत्ती धारण करविणे, त्यांची वीतरागवृत्ती वाढेल असा उपाय करणे हे सर्व वैयावृत्त्य आहे. बाह्यत: औषधोपचार, भोजन वगैरे प्राप्त होण्यासारखे नसल्यास आपण स्वत: त्यांचा कफ मलमूत्रादिक नाहीसे करणे, त्यांच्याजवळ रात्रौ जागरण करणे, हेही वैयावृत्त्य आहे.वैयावृत्त्य तप परम निर्जरेचे कारण आहे, यातून कित्येक क्रिया तर मुनीश्वराजवळ मुनीश्वरच करीतअसतात. जसे उठविणे, बसविणे, निजविणे, हातपाय पसरविणे, आखूड करणे,उपदेश देणे, कफमल दूर

करणे,धैर्यधारण करविणे वगैरे. या क्रिया दुसरे मुनी रोग प्राप्त झालेल्या मुनीला करतात. याशिवाय दुसऱ्या कित्येक क्रया जसे प्रासुक औषधी, आहारपान, उपकरण वगैरे धर्मात्मा श्रावकांनीच करण्यायोग्य आहेत. गृहस्थांनी साधूचे व श्राविकांनी अर्जिकेचे वैयावृत्त्य करावे. तसेच आपल्या धर्मबांधवांचे वैयावृत्त करावे. करुणाबुद्धीने दु:खित, रोगी, बेवारस, बालक, वृद्ध, पराधीन, बंदीगृहात पडलेले वगैरेवर उपकार करावा. आई, बाप विद्यागुरु, धनी, मित्र वगैरेनी जे उपकार केले असतील त्यांचे स्मरण करून त्यांची सेवा,सन्मान, दान, प्रशंसा वगैरेनी त्यांना सुख देण्याचा प्रयत्न करावा व त्यांचे दु:ख नाहीसे करावे. आपल्या शक्त्यनुसार दानसन्मानादिकांनी वैयावृत्त्य करणाऱ्याला हे तप घडून कर्माची निर्जरा होते. वैयावृत्त्यापासून ग्लानी नाहीशी होते. प्रवचनावर (शास्त्रावर) वात्सल्य उत्पन्न होते. आचार्य वगैरे अनेक वात्सल्य करण्याची स्थाने आहेत. त्यातून कोणाचे जरी वैयावृत्त्य केले तरी त्याच्या योगाने सर्व प्रकारचे कल्याण होते.

## ४ स्वाध्याय

स्वाध्याय नामक तपाचे पाच प्रकार आहेत. वाचना, पृच्छना, अनुप्रेक्षा (चिंतन) आम्नाय आणि धर्मोपदेश.

१) वाचना - आगम ग्रंथाचा निर्दोषपाठ व त्याचा अर्थ हे दोन्ही शिकविणे यास वाचना म्हणता.

२) पृच्छाना - परमागमाचा पाठ शिकविण्यासारखा व त्याचा अर्थ समजून देण्यासारखा दुसरा कोणताही आपला व दुसऱ्याचा उपकार नाही. दुसरे असे की परमागम शिकवून योग्य शिष्य तयार करणे हे धर्माचा स्तंभ उभा करण्यासारखा आहे. जिनधर्म हा शास्त्रज्ञानावरच अवलंबून आहे. प्रतिमा व देवालये ही काही मुखाने बोलत नाहीत. साक्षात् बोलणारा, देवाप्रमाणे हिताची प्रेरणा करणारा व अहितापासून रक्षण करणारा फक्त भगवान सर्वज्ञाचा परमागमच आहे. म्हणून शास्त्र शिकविण्याविषयी नेहमी तत्पर असावे. आपणाला उत्पन्न झालेला संशय नाहीसा होण्याकरिता विशष ज्ञान असणाऱ्यास विनयाने प्रश्न करावा. प्रश्न केल्याशिवाय संशय कसा दूर होणार( व सन्यग्ज्ञान तरी कसे प्राप्त होणार( म्हणून प्रश्न करणे याला पृच्छना महणतात. अथवा आपणाला आगमातील शब्दाचा जो अर्थ समजला असेल तो विषय ज्ञानवानाच्या तोंडून ऐकला तर आपले ज्ञान दृढ होते. ज्ञानातील शिथिलपणा नाहीसा होतो. याकरिता विशेषज्ञात्याला प्रश्न करावा. अथवा आपणाला संक्षेपात समजले असेल ते विस्तारपूर्वक समजून घेण्याकरिता मोठ्या

विनयाने सम्यग्ज्ञानी पुरुषाला विचारावे. आपली उच्चता, आपले पांडित्य दाखविण्याकरिता अथवा दुसऱ्याचा तिरस्कार करण्याकरिता अथवा दुसऱ्याचा उपहास करण्याकरिता सम्यग्दृष्टीने कधीही प्रश्न विचारू नये. शब्दात, अर्थात व शब्द आमि अर्थ दोहोंतही प्रश्न करू न निर्णय करू न घेणे हा पृच्छना नामक स्वाध्याय आहे. ३) अनुप्रेक्षा - परमागमाने जाणलेल्या शब्दार्थांना आपल्या मनात धारण करू न त्याचे वारंवार चिंतन करणे अथवा शास्त्रातून श्रवण केलेले हे दोष आपणाला सोडून देण्यायोग्य आहेत, हे ग्रहण करण्यायोग्य आहेत, आपल्या स्वरू पाहून अन्य द्रव्यक्षेत्र जाणण्यायोग्य नाहीत वगैरे, विषय वरचेवर चिंतणे याला अनुप्रेक्षा नामक स्वाध्याय म्हणतात. या चिंतनपासून अशुभ भावांचा नाश होऊन शुभ धर्मध्यान प्रगट होते.

४) आम्नाय - अति जलद ्थवा फार सावकाश वाचणे वगैरे वाचनाचे दोष टाळून धैर्याने एकेक अक्षर स्पष्ट व सार्थ समजून पाठ करणे, करविणे, उच्चारण करणे आणि सिद्धांताच्या परंपरेला व आगमाला विरोध न येता व लौकिकालाही विरोध न येता पठन करणे याला आम्नाय स्वाध्याय म्हणतात.

५) धर्मोपदेश - लौकिकप्रयोजन - लाभ-पूजा-अभिमा-मद वगैरे सोडून उन्मार्ग दूर करण्याकरिता, सन्मार्ग दर्शविण्याकरिता, संशय नाहीसा होण्याकरिता, अपूर्व पदार्थाचे स्वरू प प्रगट करण्याकरिता, धर्माचा प्रसार होण्याकरिता, मोहांधकार नष्ट होण्याकरिता, संसार देह भोगोपभोगापासून लोकांना विरक्त करण्याकरिता, विषयानुराग व कषाय कमी करण्याकरिता, अज्ञानाचा नाश होऊन भेदविज्ञान प्रगट होण्याकरिता व पापक्रियेपासून भीती उत्पन्न होण्याकरिता भव्यजीवांना धर्माचा उपदेश करणे हा धर्मोपदेश स्वाध्याय आहे. ज्याठिकाणी अनेक भव्यजीवांना धर्ोपदेश देण्याचे काम चाललेले असते त्याठिकाणी मन, वचन आणि काय ही तीन्ही धर्मचा विचार करण्यात लागलेली असतात. कोणत्याही रीतीने श्रोत्यांच्या मनात अनेकान्त धर्माचे यथार्थ स्वरू प ठसले पाहिजे, त्यांच्या मनात संसार देह भोगादिकाविषयी अप्रिति उत्पन्न झाली पाहिजे व कोणत्याही तऱ्हेने त्यांना भेदविज्ञान प्रापत झाले पाहिजे याप्राणे ज्या वक्त्याचा अभिप्राय असतो, तोच सत्यार्थ धर्माचा उपदेश देऊ शकतो. ज्याचे अंत:करण धर्माकडे लागेल तोच इतर श्रोत्यालाही धर्माकडे प्रवृत्त करील. धर्मोपदेश देणाऱ्याच्या अंगी कोणते गुण असावयास पाहिजेत याविषयी आत्मानुशासनात सांगितले आहे की, ज्यांची बुद्धी त्रिकालविषयी असेल, म्हणजे ज्यांनी मागील अनेक चालीरीतींचे ज्ञान परमागमावरू न घेतले नाही तो वस्तूचे यथार्थ स्वरू प प्रतिपादन करू शकणार नाही. ज्याला वर्तमानकालीन व पुढील कालाचे धारण नाही, तो अयोग्य सांगेल. म्हणून वक्त्याला आपली बुद्धी सूक्ष्म करू न धर्माचा उपदेश निश्चय व्यवहारदृष्टीने देता आला पाहिजे.

पुन: तो वक्ता चार अनुयोगातील सर्व शास्त्रांचे रहस्य जाणणारा असला पाहिजे. ज्याला ते समजले नाही व तो जर वक्तृत्व करू लागेल तर त्याला श्रोत्यांना यथार्थ समजाविता येणार नाही. कोटे प्रमाणाचा, न्यायाचा, निक्षेपाचा, गुणस्थानाचा, मार्गणेचा, त्रैलोक्याचा, कर्मप्रकृतीचा व आचाराचा विषय प्राप्त झाला तर त्याला त्या त्या विषयाचे यथार्थ ज्ञान नसल्याने नि:शंक प्रतिपादन करता येणार नाही, म्हणून तो संपूर्ण शास्त्राचा पारगामी असला पाहिजे.

याशिवाय वक्त्याला लौकिक रीतीरिवाजाचेही ज्ञान पाहिजे. ते नसेल तर लोकविरुद्ध व्याख्यान तो देईल व त्याचा काहीही परिणाम होणार नाही.

ज्याला भोजन, वस्त्र, धन, स्थान, अभिमान वगैरे पदार्थांची इच्छा असेल तो वक्ताही यथार्थ प्रतिपादन करू शकणार नाही. त्याला लोकरंजन करून स्वार्थ साधावयाचा एकच धोरण असते. याशिवाय लोभी पुरुषाला सत्यवक्तृत्व नसतेच. वक्ता समयोजित तत्काल उत्तर देण्याइतका बुद्धिमान असला पाहिजे. तसा नसेल तर सभेत गडबड व गोंधळ उडून त्याची छाप लोकावर बसत नाही. वक्ता मंदकषायी असला पाहिजे. कारण ज्याचे रागद्वेष मंद झाले नसतील अशा क्रोधी, लोभी, कपटी व अभिमानी पुरुषाच्या उपदेशाचा कोणावरच परिणाम होत नाही.

याशिवाय वक्त्यामध्ये कोणी प्रश्न करण्याच्या अगोदरच त्याचे उत्तर दण्याचे चातुर्य असले पाहिजे. म्हणजे तुम्ही जर याविषयी असे म्हणाल तर याचे उत्तर असे आहे व असे म्हणाल तर त्याचे समाधन असे होईल, याप्रमाणे स्वत:च प्रश्न उपस्थित करून त्याच्या उत्तरांनी श्रोत्यांच्या मनातील संशय नाहीसे करण्याची शक्ती पाहिजे व याप्रमाणे त्याने वस्तुस्वरूपाचे व्याखघ्याने केले तर कोणाला प्रश्न करण्यास अथवा संशय घेण्यास जागाच रहात नाही. व्याख्यान चालले असता जर वरील पद्धतीन विवेचन करण्याची वक्त्यास पात्रता नसेल तर सभेत अनेक प्रश्न उपस्थित होऊनसर्व गोंधळ उडून जातो. उत्तर देता याणार नाही असा कोणी प्रश्न कदाचित सभेत मांडलाच तर वक्त्याने त्यावेळी सहनशीलता धारण करावी. विकारवश होऊन क्रोधायमान होऊ नये. त्यामुळे ज्यांच्या मनात अनेक संशय उत्पन्न होत असतात ते प्रश्न करून आपला संशय नाहीसा करून घेण्यास भितात. धर्मोपदेश करून जीवाचे कल्याण करण्याचा वक्त्याचा हेतू त्यामुळे सिद्ध होत नाही.

वक्त्यामध्ये प्रभुत्व म्हणजे श्रेष्ठता हा गुण असावयास पाहिजे. कारण वक्ता हा मोठा आहे, श्रेष्ठ आहे, विद्वान आहे असा श्रोत्यांचा समज असला तरच ते त्याचा उपदेश ग्रहण

करण्यात उद्युक्त होतात. तो तसा नसेल तर त्याचा उपदेश कोणीही ऐकणार नाही. सर्व लोकांना प्रिय असेल तोच खरा वक्ता होय.

ज्याने स्वत: गुरुपरंपरेने अथवा शास्त्रपठणाने चांगल्या रितीने ज्ञान करून घेतले असेल तोच व्याख्यान देण्यास अयोग्य आहे. कारण ज्याला स्वत:लाच चांगले समजले नाही तोदुसऱ्यास काय समजविणार( जो स्वत:च अंधकारस्वरूपाचा असेल तो परदार्थांना कसा प्रकाशित करील( रदीपक स्वयंप्रकाशक आहे म्हणून तो घटपटादिक परपदार्थांनाही प्रकाशित करतो.

ज्याचे वर्तन व्यवहारात, परमार्थात, धर्मात, देण्याघेण्यात, बोलण्यात, व्यापारात, उपीविकेत, भोजनवस्त्रादिकात वगैरे सर्व गोष्टीत निर्मल असेल तोच उपदेश देण्यास योग्य समजावा. ज्याचे या विरुद्ध वाईट वर्तन असेल त्याला वक्तृत्व शोभत नाही.

जो स्वत:व्यसनी असेल त्याची जगात मान्यता नसते. ज्याला इतर लोकांना ज्ञान प्राप्त व्हावे व ते रत्नत्रय मर्गाकडे प्रवृत्त व्हावे अशी इच्छा असेल तो धर्मविवेचन करणारा वक्ता होय.

वक्ता ज्याची ज्ञानी पुरुष प्रशंसा करीत असतील असाअसावा. ज्याची विद्वानाकडून प्रशंसा होते, त्याच्या व्याख्यानावर लोकांचा दृढ विश्वास बसतो.

वक्ता उद्धट नसावा. कारण उद्धट पुरुष सर्वांना अप्रिय असतो. वक्ता देशकलाची रीत, श्रोत्यांची सुष्ठता, दुष्टता, प्रवीणता, मूढता, शक्ती वगैरे जाणून उपदेश देणारा असल्यास त्याचा लोकावर फार परिणाम होतो. लौकिकज्ञानाशिवाय यथायोग्य उपदेश करता येत नाही. वक्ता कोमल मनाचा असावा. कारण कठोर बोलणाऱ्याचे भाषण अनादराणीय होते. कठोर भाषण ऐकण्याने श्रोता हितपराङ्मुख होतो. वक्त्याला आपल्या वक्तृत्वगुणाबद्ल धनभोजनवस्त्रपात्र मिळविण्याची इच्छा नसावी.

वक्ता स्पष्ट बोलणारा असावा. अस्पष्ट बोलणाऱ्याचे उच्चार न समजल्यने अर्थबोध होत नाही.

वक्ता गोड भाषण करणारा असावा. ज्याचे मिष्टभाषण ऐकतापासून श्रोत्याला आपल्या सर्व अंगात अमृतच कानावाटे ओतले जात आहे की काय असे वाटावे.

वक्ता ज्याला श्रोते हा आपल्याहून श्रेष्ट आहे असे समजत असतील असा असावा. याचप्रमाणे सम्यग्दर्शन, चारित्र, वात्सल्य वगैरे अनेक गुणांचा धारक असावा. याप्रमाणे वक्त्याचे अनेक गुण आहेत. ते ज्याच्या अंगी असतात तोच धर्मोपदेश देण्यास योग्य होतो. अशा प्रकारच्या वक्त्याचा उपदेश एखाद्या महाभाग पुरुषालाक वचितच मिळतो. अशा उपदेशाला सम्यग्देशनालब्धि म्हणतात. ही प्राप्त होणे दुर्लभ आहे. योग्य पात्र असल्याशिवाय त्यात वस्तू ठरू शकत नाही. अयोग्य पात्रात वस्तू ठेवली तर वस्तूचा व पात्राचा दोघांचाही नाश होतो. तद्वत योग्य श्रोता असल्याशिवाय धर्मोपदेशाचा उपयोग होत नाही. म्हणून श्रोत्याचे संक्षेपात स्वरूप समजणे अवश्यक आहे.

ज्याला उपदेश देत असूनही सम्यक्श्रद्धान वगैरे होत नाही त्याला तो देऊनही व्यर्थ आहे. म्हणून प्रथमत: श्रोता भवय असावा. ज्याला आपले हिताहित कशात आहे याचा विचार करण्याची संवय असते तोच खरा श्रोता. ज्याला याप्रमाणे विचार नाही तो धर्मश्रवण करीत नाही. त्याला फक्त आपल्याला विषयलाभ कशात होईल एवढीच चिंता असते.

श्रोता दु:खाला भिणारा असावा. अर्थात् त्याला नरकतिर्यंचादि गतीतील दु:ख कधीही प्राप्त होऊ नये असे वाटले पाहिजे. हे भय ज्याला नाही तो पाप सोडण्याला तयार होणार नाही अथवा विषयकषायाचा त्याग करा म्हणून उपदेशिलेल्या शास्त्राचे श्रवण करणार नाही.

श्रोता सुखाची इच्छा करणारा असावा. तसा नसेल तर तो धर्मश्रवण करणार नाही. ज्याला कर्णेंद्रिय असूनही ते बिघडले असेल तर तो कशाने श्रवण करणार( ज्याला धर्मश्रवण करण्याची इच्छा असेल तो श्रवण करील. इच्छा असून जर आळस, प्रमाद व कुसंगतीमुळे तो श्रवण करणार नाही तर ती इच्छाही व्यर्थ होय. कोणी श्रवणही करील परंतु गुरूंनी जे सांगतले ते ग्रहण केले नाही तर ते श्रवण करणे व्यर्थच आहे. ग्रहण केले व धारणा राहिली नाही व ऐकताच विस्मरण झाले तरी ग्रहण होऊनही उपयोग नाही. विचार करून प्रश्नोत्तराच्या रूपाने तत्त्वनिर्णय करून घेतला नाही तर जे श्रवण केले असेल त्यात संशय राहतो. म्हणून प्रश्नोत्तररूपाने शंकेचे निरसन करून घेणारा श्रोता असला पाहिजे. श्रोत्याने दयामयी व सुख देणाऱ्या अशा धर्माचे श्रवण करावे. युक्तीने अथवा प्रमाणाने ज्यात बाधा येत नाही असा धर्म वीतराग सर्वज्ञांनी प्ररूपित आगमापासून निघालेला आहे. अशा धर्माचे वारंवार श्रवण व चिंतन करन तो ग्रहण करावा. विचार न करता मिथ्यात्व व हिंसेला कारण अशा धमाचे ग्रहण केले तर नरपकामध्ये जावे लागेल. ज्या धर्मात युक्तीप्रमाणे बाधा येत असेल व जो सर्वज्ञाच्या आगमाशी विरुद्ध असेल तो खरा धर्म नव्हे म्हणून तो श्रवण करण्यास योग्य नाही.

श्रोता दुराग्रही नसावा. तसा असल्यास त्यावर कोणाच्याही उपदेशाचा परिणाम होत नाही. याप्रमाणे अनेक गुणांना धारण करणारा श्रोता असला तर तो धर्मश्रवण करून आत्मकल्याण करून घेतो.

येथे प्रकरणानुसार श्रोत्याच्या जाती किती आहेत हे दृष्टांत देऊन सांगतो. कित्येक श्रोतांचा स्वभाव मातीच्या स्वभावासारखा असतो. जसे माती पाणी पडल्याबरोबर नरम होते व पाणी वाळले की पुनः घट्ट होते तसे धर्मश्रवण करीत असतांना त्याचे परिणाम कोमल होतात, धर्मोपदेश संपला की पूर्व स्वभाव कायम.

कित्येक श्रोते चाळणीसारखे असतात. चाळणी जी चांगले धान्य खाली टाकून त्यातील खडे, माती ग्रहण करते तद्वत् धर्मकथेतील सार टाकून अवगुण ग्रहण करावयाचाकित्येकांचा स्वभाव असतो. अशा श्रोत्यांना चाळणीसारखे श्रोते म्हणतात.

कित्येक श्रोते हलगटासारखे असतात. हलगटाला निर्मल जल असलेल्या सरोवरात नेऊन सोडले की थोड्याच वेळात तो ते गढूळ करून टाकतो. तद्वत हा श्रोता सभेतील सर्वांची मने मलिन करून टाकतो.

कित्येक श्रोते हंसासारखे असतात. हंस ज्याप्रमाणे दूध पाणी वेगळे करून फक्त दूध ग्रहण करतो, तद्वत उपदेशातील निरर्थक भाग टाकून आत्महिताभाग ते ग्रहण करतात.

कित्येक श्रोते पोपटासारखे असतात. पोपटाकडून रामनाम बोलवा अथवा दुसरे कंही बोलण्यास शिकवा तेवढेच शब्द तो उच्चारितो. त्याला राम कोण किंवा रहीम कोण याचे ज्ञान नसते. तद्वत पापपुण्याचा विचार नसणाऱ्या श्रोत्याला स्वपर-स्वरूपाचे ज्ञान नसते.

कित्येक श्रोते मांजरासारखे असतात. मांजर हे झोप घेत असले तरी आपल्या शिकारीवर त्याची नजर असतेच. तद्वत हा श्रोता धर्मकथा श्रवण करीत असला तरी आपल्या विषयकषायांच्या प्रवृत्तीमध्ये लीन असतो.

कित्येक श्रोते वारंवार वक्त्याला डासासारखे त्रास देणारे असतात.

कित्येक श्रोते बकऱ्याच्या जातीसारखे असतात. जसे बकऱ्याला अत्तरासारखी सुगंधी द्रव्ये कितीही लावली तरी तो आपल्या अंगचा दुर्गंध टाकीत नाही, तसे हे धर्माचे श्रवण करूनही पापच करीत राहतात.

कित्येक श्रोते जळूसारखे असतात. जळू ही शरीरावरील नासलेले रक्त शोषण करते. तद्वत् हे श्रोते धर्म श्रवण करताना दृष्टान्तातील अथवा पुण्यपुरुषाच्या कथेतील पापाचा भाग आढळेल तेवढाच ग्रहण करतात.

कित्येक श्रोते फुटलेल्या भांड्यातील जलाप्रमाणे कसलाही उपदेश अंत:करणात धारण करीत नाहीत.

कित्येक श्रोत्यांना धर्मामृतपान करवूनही ते सर्पाप्रमाणे दूध पिऊन विष ओकणारे असतात.

कित्येक तृणभक्षण करून दूध देणाऱ्या गाईप्रमाणे असतात.

कित्येक काळ्या पाषाणणाप्रमाणे कठोर असतात. त्यांना पुष्कळ धर्मोपेश दऊनही तो त्यांच्या हृदयात प्रविष्ट होत नाही.

कित्येक कसोटीप्रमाणे परीक्षाप्रधानी असतात.

कित्येक तागडीच्या दांडीप्रमाणे कमी अधिक प्रमाण तोलून पाहतात.

याप्रमाणे श्रोत्याच्या उत्तम, मध्यम, कनिष्ठ अशा जाती आहेत. ज्याचा जसा स्वभाव असेल त्यावर तसा धर्मोपदेशाचा परिणाम होतो. याप्रमाणे धर्मोपदेशनामक स्वाध्याय प्रकरणात वक्ता व श्रोता यांचे लक्षण सांगितले व पाच प्रकारच्या स्वाध्यायाचे वर्णन केले.

स्वाध्यायकरण्याने बुद्धीचे तेज वाढते, विचार निर्मल होतात, धर्माचे श्रध्दान दृढ होते, संशय नाहीसे होतात, इतर लोकांनी घेतलेल्या शंकाचे निवारण करता येते, धर्मप्रीती वाढते, तपश्चरण वाढते, आचार उज्ज्वल होतात. अतिचार (दोष) नाहीसे होतात. पापक्रियेचा परिहार होतो. कुधर्मावरील प्रेम नाहीसे होते, पंचपरमेष्ठीच्या ठायी प्रीती द्विगुणित होऊन सम्यग्दर्शन प्रगट होते. संसार,देह, शुभध्यानात काल जातो, आर्त रौद्र ध्यान नाहीसे होते, जगात मान्यता वाढत, निर्मल कीर्ती चोहींकडे पसरते, दुर्गतीचा अभाव होऊन स्वर्गातील उत्तम सुख आणि मोक्षातील अतींद्रिय सुख प्राप्त होते. याप्रमाणे अनेक गुणांना उत्तन्न करणारे हे तपश्चरण जाणून वीतराग भगवंतानी प्रकाशित केल्या आगमाचा अभ्यस केल्याशिवय हा मुष्यजन्म व्यर्थ घालवू नये.

## ५ कायोत्सर्ग

यापुढे कायोत्सर्ग तपाच्या स्वरू पाचा विचार करू . बाह्याभ्यंतर उपाधीचा त्याग करणे याला कायोत्सर्ग म्हणतात. बाह्य म्हणजे शरीर धनधान्यादि उपाधीचा त्याग करणे याला बाह्योपाधि त्याग म्हणतात व अभ्यंतर क्रोध, मान, माया लोभ, हास्य, रति, अरति, शोक, भय, जुगुप्सा व तीन वेद परिणाम ह्या अभ्यंतर उपाधी आहेत. यांचा त्याग करणे. बाह्यत्यागामध्ये आहारादिकांचाही त्याग अतर्भूत होतो. सन्यास घेण्याच्या वेळी आयुष्य पूर्ण होईपर्यंत यांचा यावज्जीव त्याग करावा लागतो. सल्लेखनोचा विचार करताना याचा विशेष विचार केला आहे म्हणून येथे विस्तारपूर्वक लिहिले नाही.

## ६ ध्यान

यापुढे सहाव्या ध्यान नामक तपाचे स्वरू प सांगतात. एकाच पदार्थाचे चिंतन करण्यात मनाचे परिणाम लावणे याला ध्यान म्हणतात. हे ध्यान उत्तम संहनन असणाऱ्याला अन्तर्मुहूर्त (पंचेचाळीस मिनिटे) राहते. यापेक्षा अधिक काल राहू शकत नाही. वज्रवृषभनारासंहनन, वज्रनाराचसंहनन आणि नाराचसंहनन अशी तीन उत्तम संहनने आहेत. ती ज्यांना असतात त्यांनाच मुख्यत्वेकरू न एका पदार्थावर चित्त एकाग्र करता येते. जे लोक संसारिक क्रिया म्हणजे गमन, भोजन, शयन, अधि्ययनादि क्रियांमध्ये निमय ठेवीत नाहीत त्यांना ध्यान होत नाही.

या भावनेत प्रशस्त (चांगल्या) संकल्पाने शुभध्यान व अप्रशस्त (वाईट) संकल्पाने अशुभध्यान होते. यातून शुभध्यानाचे धर्मध्यान व शुक्लधअयान असे दोन भेत आहेत. अशुभध्यानाचेही अर्तध्यान व रौद्रध्यान असे दोन भेतआहेत. याप्रमाणे सामान्यधअयानाचे चार प्रकार झाले. आता अशुभध्यान हे जीवाला अनादिकालापासून चालत आलेला आहे. हे शिकविण्याकरिता कोणतेही शास्त्र रचलेले नाही. कोणी ही शिकिवल्याशिवाय हे जीवाला होत असते. अशुभध्यानाचा अभाव करण्याकरिता प्रथमत: चार प्रकारच्या आर्तध्यानाच्या स्वरू पाचा विचार केला पाहिजे.

आर्तधअयानाचे अनिष्टसंयोगज, इष्टिवयोगज, रोगजनित व निदानजनित असे चार भेद आहेत. ऋत म्हणजे दु:ख त्याच्या अवस्थेत होणारे ते आर्तध्यान होय. अनिष्ट पदार्थाचा संयोग होण्याने दु:ख उत्पन्न होते. त्यावेळी जे चिंतन होते ते अनिष्टसंयोगज आर्तध्यान होय. आपल्या

शरीराचा, धनाचा आजीविकेचा, स्वजनमित्रादिकांचा नाश करणारा दुष्ट, शत्रु, दुष्ट राजा, राचजाचे दुष्ट अधिकारी, दुष्ट शेजारी इत्यादिकांचे संयोग प्राप्त होणे, रोगयुक्त शरीर, चोर, दारिद्र , नीच ाति, नीच कुलात जन्म, दुर्बलता, असमर्थता, इंद्रियविकलता वगैरे प्राप्त होणे, सिंह, वाघ, साप, कुत्रा, उंदीर, अग्नी, जल, इत्यादिकांचा संयोग येऊन मिळणे, दुष्ट बंधुवर्ग, दुष्ट बायको, व्यसनी मुले, इत्यादिकांचा संयोग होणे हा सर्व संयोग दु:ख उत्पन्न करणारा आहे. यामुळे परिणामामध्ये होणारी विकलता नाहीशी होण्याकरिता जे रात्रंदिवस चिंतन करणे याला अनिष्टसंयोगज आर्तध्यान म्हणतात. अतिशय थँडी, ऊन, पाऊस यापासून डांस, मच्छर, मुंग्या, ढेकूण, दुष्टांची दुर्वचने, वगैरचे स्मरण व चिंतन करणअयापासून परिणामात अतिशय दु:ख उत्पन्न होते व ते दिवसा, रात्री, घरी-दारी, अथवा कोणत्याही स्थली, कोणत्याही काली नाहीसे होत नाही. यामुळे होणाऱ्या आर्तपरिणामापासून घोर कर्माचा बंध होतो. म्हणून हे सर्व अनिष्टसंयोगज दु:ख होय. हा आर्तध्यानाचा पहिला भेद आहे. हे दु:ख जे सम्यग्दृष्टी जीव आप्लाय परिणामात होऊन देत नाहीत त्याच्या कर्माची निर्रा होते. जे ज्ञानवान सत्पुरुष असतात ते अनिष्टसंयोग प्राप्त झाला तरी आपल्या परिणामात दु:ख उत्पन्न होऊ देत नाहीत. ते त्यावेळी खाली लिहिल्याप्रमाणे चिंतन करतात.

(( हे आत्मन्, तुला दु:ख देणारी ही जी प्रस्तुत अनिष्ट सामग्री उपस्थित झालेली आहे ती सर्व तू उपार्जन केलेल्या पापकर्माचे फल आहे. यात दुसऱ्याचा काहीही दोष नाही. इतरांना आपला नाश करणारे तू मानू नकोस. तू ज्याअर्थी पूर्वी परधनहरण केले आहेस, अन्याय केले आहेस, अनेक निर्बलांना संताप दिला आहेस, दुसऱ्यांना कलंक लाविला आहेस, खोच्या धर्माचे शिक्षाण दिले आहेस, शीलवंत त्यागी तपस्व्यांना दूषण लाविले आहेस, कुमार्गाची प्रवृत्ती केली आहेस, खोट्या गोष्टी ऐकण्यात गढून गेला आहेस, अन्यायाने विषयाचे सेवन केले आहे, निर्माल्य (देवद्रव्य) भक्षाण केले आहेस, त्याअर्थी ती सर्व कर्मे योग्यवेळी उदयाला आली आहेत. आता या कर्माच्या उदयप्रसंगी दु:ख करून प्रपात झालेले कष्ट भोगशील तर नवीन पापाचा बंध पुन: करशील, रे, तू आता पुष्कळसे दु:ख केले म्हणून कर्म थोडेच तुला सोडणार आहे. ते तर अधिकाधिक दु:ख देऊल व तुझी बुध्दी भ्रष्ट करील, ते तुझ्या अंत:करणात लवमात्र धर्म राहू देणार नाही. याशिवाय या सर्व क्रिंयांनी तुज्या पापाचा बंध अधिक दृढ होईल. म्हणून आता धैर्य धारण करून प्राप्त झालेले दु:ख समभावाने सहन कर. याप्रमाणए सहन करशील तर लौकरच पापकर्माचा नाश होईल. याकरिता मनात असा विचार आण की, यावेळी मला फार लाभ झाला म्हणवयाचा( कारण हे कर्म यावेळी उद्याला येऊन आपले फन देऊन नाहीसे होत आहे. मी अशा वेळी जिनधर्म धारण केलेला आहे. यावेळी परम शआंतभावाने कर्माचा प्रहार सहन करून

त्याच्या ऋणातून मोकळे होऊ दे. हेच कर्म जर दुसऱ्या एखाद्या प्रसंगी उदयाला आले असते तर त्यापासून अधिक बंध होऊन असंख्यात जन्मापर्यंत याच्या फेऱ्यातून सुटलो नसतो.((

याशिवाय आणखी असाही विचार कर की, हेअनिष्ट संयोग असे मला दु:खदायक वाटतात तसेच अन्य जीवांनाही दु:खद होत असतील म्हणून मी इत:पर कोणत्याही अन्य जीवाला योग्य वचन बोलून व निष्काळजीने शरीराचे व्यापर करू न दु:ख होईल अ से वर्तन करू नये व त्याना दु:ख प्रपात व्हावे असे चिंन पण करू नये. त्याप्रसंगी मला जे अनिष्ट संयोग प्राप्त झाले आहेत. त्यातून असंभात पटीत जास्त नरकतिर्यचादिक पर्यायात व मनुष्यपर्यायात अनेक वेळा प्राप्त झ ाले आहेत. अनेक प्रकारचे दुर्वचन सहन केले, अनेक प्रकारचे मार खाऊन नित्य दु:ख सोसले, अनेक जन्मात दारिद्र्याचे दु:ख भोगले, ओझ्याचे, मर्मस्थानी माराचे, हात-पाय-नाक छेदण्याचे, डोळे कढ ण्याचे, क्षुधेचे, तृषेचे, शीत-उष्णाचे, उन्हात पडून राहण्याचे, वाऱ्याचे, दुष्ट जीवाकडून भक्षण केले गेल्याचे, पुष्कळ कालापर्यंत बंदिगृहात अडकून राहण्याचे हातपाय छेदन होण्याचे व बांधून घालण्याचे घोर दु:ख भोगले आहे. तसेच अनेक वेळा अग्नीत जळून मरण पावलो आहे, अनेक वेळा पाण्यात-गाळात फसून मेलो आहे. याप्रमाणे मनुष्तिर्यंचयोनीत उत्पन्न होऊन अनिष्ट संयोग अनंत वेळा भोगले आहेत. नरकगतीचे दु:ख तर प्रत्यक्षज्ञानी केवलीच जाणण्यास समर्थ आहेत. ते दुसऱ्याला समजणार नाही. या संसारात राहावयाचे असेल तोपर्यंत अनिष्टसंयोग हा राहणारच. आता मी पापकर्माच्या उदयाने पंचमकालात मनुष्य होऊन ज्याअर्थी जन्मलो आहे त्याअर्थी आता त्याचे भय बालगून काय उपयोग( मनुष्य जन्मातही अनंतकाल ज्याचा लाभ होणे दुर्लभ अशा धर्माचे परमनिधान जर मला प्राप्त झाले आहे तर, याच्या लाभाने आनंद मानून अनिष्टसंयोगजनित दु:खाचा अभाव करावा व परमशांतभाव धारण करू न कर्माच्या उदयाला जिंकावे हेच योग्य आहे. याप्रमाणे अनिष्टसंयोगजनित आर्तध्यानाचा विचार मनात आणल्याने ते नाहीसे होते.

आर्तध्यानाच्या दुसऱ्या इष्टवियोगज या भेदाच्या स्वरू पाचा आता विचार करू . इष्ट पदार्थाच्या वियोगापासून फर दु:ख उत्पन्न होते ते असे- आपल्या अंत:करणाला आनंद देणाऱ्या व अनेक प्रकारचे सुख देणाऱ्या पुत्राचा वियोग (मरण) झाला, आपली आज्ञा पालन करणाऱ्या स्त्रीचा वियोग झाला, प्राणाहूनही प्रिय अशा मित्राचा वियोग झाला, पुष्कळशी संपत्ती व राज्यैश्वर्याचा उपभोग प्राप्त करू न देणाऱ्या स्वामीचा वियोग झाला, सुखाने उदरनिर्वाह करण्याच्या सामग्रीचा वियोग झाला, राज्यपद नाहीसे झाले, मानभंग झाला, संपत्ती नाहीशी झ ाली, सुखाने राहण्याचे स्थान जे गृह त्याचा कोणी दुष्टाने नाश केला, आपली सौभाग्यतिलक अशी कीर्ती नष्ट झाली, आपण ज्यावर अतिशय प्रेम करतो अशा वस्तू नष्ट झाल्या, तर त्यापासून

उत्पन्न होणाऱ्या दु:खाला इष्टवियोगज दु:ख म्हणतात. या इष्टवियोगापासून वरचेवर शोक, भ्रम, भय, मूर्च्छा वगैरे प्राप्त होणे, त्या पदार्थाचा संयोग पुन: कधी प्राप्त होईल याचे सदैव चिंतन करणे, वरचेवर रुदन करणे, रडता रडता निश्चेष्ट होणे, मोठ्याने विलाप करणे, वारंवार दु:खाने पीडित होऊन हाहा:कार करणे हे सर्व तिर्यंच गतीत उत्पन्न होण्यास कारण असे इष्टवियोगज आर्तध्यान आहे. या इष्टिवियोगापासून मोठमोठ्या शूर म्हणविणाऱ्यांचे देखील धैर्य नाहीसे होते. मोठमोठी माणसे दीन होऊन जातात, कित्येकांच्या हृदयांना कापरे भरते, कित्येक मरून जातात, कित्येक पर्वतावरून उडी टाकतात, कित्येक विषभक्षणाने व शस्त्रघाताने आत्मघात करून घेतात. अशा या इष्टवियोगासारखी पीडा दुसऱ्या कशापासूनही होत नाही. या वियोगाच्या दु:खाने इहपर दोन्ही लोकांचा नाश होतो. जो संसार देहभोगापासून विरक्त होऊन, भगवान वीतराग सर्वज्ञाच्या वचनावर विश्वास ठेवून, सम्यग्दर्शन धारण करणारा असेल तोच पदार्थाच्या सत्यस्वरूपाला जाणून इष्टवियोगापासून उत्पन्न होणाऱ्या दु:खाला जिंकतो. तो त्यावेळी असा विचार करतो-

हे आत्मन्, संसारात ज्या सर्व पदार्थांचा तुझ्याशी संयोग झाला आहे, त्याचा खात्रीने वियोग होणार आहे. तो रोकण्यास देव, देवता, इंद्र,मंत्र, तंत्र, औषध, सैन्य, शक्ती, सेवकसमहू, बुद्धी, मित्र, धन, ऐश्वर्य यापैकी कोणीही समर्थ नाही. असे, आपल्या देहाचाही जेथे खात्रीने वियोग होणार हे जर ठरले आहे तर, देहाशी सबंध ठेवणाऱ्या इतर पदार्थांचा वियोग होणार यात नवल काय(तू पिता, पुत्र, माता, बहीण वगैरे आप्तवर्गाना आपले मानून प्रीती करीत आहेस, पण यांचा संबंध तुझ्या आत्म्याशी नाही. या मुखावर वेष्टिलेल्या कातड्याला, दुर्गंधाने भरलेल्या नाकाला व चामड्याने मढलेल्या डोळ्याला पाहून तू मोहित होऊन त्यांना आपले आहेत असे मोठ्या प्रेमाने मानीत आहेस. या वांचे एके दिवशी अग्नीत भस्म होणार आहे. याचप्रमाणे आईचा, बापाचा, आवडत्या (लाडक्या) स्त्रीचा, सत्पुत्राचा, भावाचा, ऐश्वर्याचा, धनसंपदेचा, घरादारांचा, संदेश, शहर, खेड्याचा, मित्राचा, धन्याचा व सेवक वगैरे सर्वांचा वियोग अवश्य होणार आहे. म्हणून इष्टवियोगाचे दु:ख करून अशुभ बंध करन घेऊ नकोस. जर हे पदार्थ हित करणारे असते तर ते तुला सोडून कां गेले असते( ज्याअर्थी इष्टपदार्थाचा वियोग होतो त्याअर्थी व तुला सम्यग्ज्ञान असेल तर, धर्म हाच आपला हितकर्ता (इष्ट) मानून त्याचे चिंतन कर. जर धर्माला इष्ट मानशील तरच तू या दु:खातून सुटशील. याशिवाय इतर स्त्री, पुत्र, कुटुंब, धन परिग्रह वगैरे इष्ट नाहीत. हे पदार्थ ममत्व उत्पन्न करून इंद्रियांच्या विषयात प्रवृत्ती करवितात. अनीतीकडे प्रवृत्त करून नाहीत. हे पदार्थ ममत्व उत्पन्न करून इंद्रियांच्या विषयात प्रवत्ती करवितात. अनीतीकडे प्रवृत्त करून दुर्गतीला पोहोचवितात. अर्थात असले हे पदार्थ इष्ट

कसले( जे परमहितरू प धर्माकडे प्रवृत्त करू न दुर्गतीला पोहोचवितात. अर्थात असले हे पदार्थ इष्ट कसले( जे परमहितरू प धर्माकडे प्रवृत्त करतात असे धर्मात्मा गुरू अथवा इतर सहधर्मी जन तेच खरे इष्ट होत. याशिवाय इतर कोणीही इष्ट पदार्थ नाही. कुटुंबातील ही माणसे, तुमच्ाय पुण्योदयाने जोपर्यंत तुम्हाजवळ धन आहे तोपर्यंत इष्ट आहेत. धन नाहीसे होताच ही सर्व नाहीशी होतील. धनाशिवाय कोणीही कोणाला इष्ट मानीत नाही. धन हे पुण्याच्या स्वाधीन आहे. म्हणून पुण्याचा प्रभावच इष्ट आहे असे माना. पुण्याचा उदय प्राप्त होईल तर स्वर्गलोकातील महानइष्टसामग्री प्राप्त होऊन असंख्य देवज्याची सेवा करतात असे इंद्रपद, प्रेमळ अशा हजारो देवांगना, अद्भुत भोग वगैरे प्राप्त होतील. या उलट पापाचा उदय आला असता आपला अतिशय आवडता पुत्र व आपण मोठ्या परिश्रमाने पोसलेले शरीर, हे देखील भयंकर दु:ख देणारे वैरी होतात. आता संसारामध्ये अज्ञानामुळे आपण स्त्री, पुत्र, मित्रादिकांना आपलेहित करणारे असे मानण्याची प्रवृत्तीआहे. वस्तुत: विचार केला असता असे दिसून येतेकी, या जीवाशी इतरांची अनंत नाती झाली आहेत. या जीवाने आजपर्यंत इतक्‍या असंख्य मातेचे दूध प्राशन केले आहे की, प्रत्येक आईचा एकेक थेंब जर आज एकत्र केला तर अनंत समुद्र भरू न जातील. याप्रमाणे इतकी शरीरे याने धारण केली आहेत की, त्या देहांपैकी एकेका देहाचा एकेक केस एकत्र केला तर त्या केसांचे मेरू पर्वतासारखे प्रचंड अनेक पर्वत होतील. आजपर्यंत इतक्‍या कुटुंबाकरिता या जीवाने रुदन केले आहे व यांच्याकरिता इतकी कुटुंबेरडली आहेत की, या सर्वांचे अश्रुपात एकत्र केले तर अनंत समुद्र भरू न जातील. यातूनविचर करा की, तुम्ही कोणकोणत्या पदार्थांना इष्ट मानणार( याप्रमाणे अनेक इष्ट पदार्थ आजपर्यंत तुम्ही ग्रहण करू न सोडले आहेत. ज्याअर्थी इष्ट पदार्थ विद्यमान आहे त्याअर्थी त्याचा वियोग होण्याचा काल खात्रीने यावयाचाच. तो केव्हा येईल हे मात्र निश्‍चित नाही. मृत्यू प्राप्त होणार हे खास. पण तो केव्हा व कसा येणार हे मात्र कोणासही सांगता येणार नाही. जी इष्ट सामग्री आज तुम्हाला दिसत आहे व ज्याविषयी तुमच्या मनात एवढ ी पूज्यबुद्धि वसलेली आहे, त्यांचा वियोग होण्याची वेळ अचानक प्राप्त होईल. ज्या इष्ट सामुग्रीवरील प्रेमाने तुम्ही या संसारात फसून राहिला आहांत व त्या सामुग्रीकरिता पंचपाप उपार्जन करीत आहात, ती सामग्री अवश्यमेव नाहीशी होणार आहे. वियोग होण्याची वेळ प्राप्त झाली असता ती रक्षण करण्यास कोणीही समर्थ नाही. याकरिता तिर्यंचगतीला कारण असा इष्टवियोग प्राप्त झाला असता दु:ख करू नका, त्यावेळी पुढ ील विचार मनात आणा.

((हे शरीर पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे चंचल आहे. याचा एका क्षणात नाश होऊन जाणार आहे. ही लक्ष्मी इंद्रजालाप्रमाणे आभास उत्पन्न करणारी आहे. हे स्त्री, पुत्र, मित्र,

कुटुंबादिक प्रचंड वायूच्या लहरींनी समुद्रात उत्पन्न होणाऱ्या लाटेप्रमाणे अस्थिर आहेत आणि हे विषयसुख सायंकाळच्या अभ्राच्या रंगाप्रमाणे क्षणभंगुर आहे. म्हणून यांचा वियोग झाला असता शोक करणे व्यर्थ आहे. ज्याअर्थी आपण देह धारण केला आहे त्याअर्थी त्याला दु:ख व मरण हे नियमाने प्राप्त होणार आहेत. म्हणून दु:खाचे व मरणाचे भय सोडून असा उपाय शोधून काढा की, ज्यायोगे पुन्हा देहधारण करण्याचे काम पडणार नाही.((

(( हे आत्मन् ( पुन: विचार कर की, कोणत्याही देव, दानव, मंत्र, तंत्र, औषधादिकांनी ज्याला प्रतिबंध करता येणार नाही व जो कर्माच्या वश झाल्यामुळे आपणांस प्राप्त झाला आहे असा आपल्या आप्तवर्गादिक इष्ट पदार्थाच्या वियोगाविषयी शोक करून दुर्ध्यान करणे हे निव्वळ वेडेपणाचे कृत्य आहे. पुष्कळ शोक केला तरी कोणाला करूणाबुध्दी उत्पन्न होणार आहे( व मृत मनुष्याला पुन: कोण जीवंत करू शकणार आहे( अर्थात शोकापासून काहीही उपयोग न होता उलट धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांचा नाश होणार आहे. अरे( जो उत्पन्न झाला आहे तो मुळी मरण्याकरिताच उत्पन्न झाला आहे. जो जो क्षण जात आहे तो तो मरणाचा दिवस नजीक येत चालला आहे. जसे झाडाला पाने, फुले व फळे उत्पन्न झाली आहेत, ती एके दिवशी नाहीशी होणारच, दद्वत या कुलरूपी वृक्षाला आई, बाप, पुत्र, पौत्र जे उत्पन्न झाले आहेत ते कधी तरी अवश्य नाहीसे होणारच आहेत. त्याबद्दल शोक करणे व्यर्थ आहे. अथवा भवितव्यातही टाळता येणे शक्य नाही. भवितव्याता (नशीब) ही पूर्वी उपार्जन केलेल्या कर्माच्या आधीन आहे, कर्माचा ुदय प्राप्त झाला असता तो फल दिल्या शिवाय राहात नाही असा नियम आहे. यावरू जर उष्ट वस्तूीचा नाश उदयाधीन ठरला तर त्याचा वियोग झाला असता विलाप करून शोक करतात, तो अंधारात केलेल्या नृत्याक्रियेप्रमाणे आहे. त्या नृत्याकडे कोणी पाहात नाही, तद्वत त्या शोकाकडेही कोणी लक्ष देत नाही. पूर्वी उपार्जन केलेल्या कर्माच्या उदयप्रसंगी ज्याच्या आयूचजा अंत येईल अथवा ज्याला वियोग प्राप्त होईल त्या प्रसंगाला कोण विरोध करू शकणार ( असा विचार करून दु:ख सोडून श्रेष्ठ धर्माचे पालन करण्याचा यत्न करावा.((

द्रव्योपार्जनाकरिता, अनेक प्रकारचे परिग्रह वाढिवण्याकरिता आणि आपण पुष्कळ दिवस जगावे म्हणून जे अनेक प्रकारचे कष्ट सहन करतात व रात्रंदिवस दुर्ध्यानात आपला काम घालवितात ते महामूर्ख आहेत. कारण जीवापाड श्रम केले व अनेक प्रकारची इच्छा केली, पण पपुण्यसंचय नसला तर सर्व पदार्थ प्राप्त होत नाहीत. दुसरे असे की आपला जो कोणी आप्त मरण पावला त्याला आपण जाळून भस्म करून आलो, त्या भस्माचा प्रत्येक परमाणू हवेने उडून नाहीसा झाला. आता तो आप्त पुन: प्राप्त व्हावा म्हणून शोक करणे हा मूर्खपणाच होय. हे जग इंद्रजालाप्रमाणे क्षणध्वंसी दिसत असूनही मनुष्य यात मोहून जातो हेच आश्चर्य आहे. मृत्यूचा

जो दिवस नेमलेला असेल तो प्रपात झाला असता तो एकक्षणभर देखील मागेपुढे करण्यात इंद्र, देव, दानव, फार काय पण प्रत्यक्षा जिनेंद्र देखील समर्थ नाही. हे जाणत असूनही शोक करीत राहणे अरण्य-रुदनासारखे निरुपयोगी आहे. अरण्यात मोठ्यामोठ्याने ओरडून रडले तरी तेथे समजूत घालण्यास, निदान एकेण्यास तरी कोण येईल( व त्यावर दया तरी कोठली( आपल्याइष्टवस्तूचा नाश झाला असता शोक करणे हे जर त्या वस्तूची पुनरपि प्राप्ती होत असली तर करणे योग्य होते. अथवा आपल्या शोक करण्यापासून आपणास सुख होते, आपली जगात मोठी मान्यता होते, कीर्तीवद्ध ते, धर्मसाधन घडते व द्रव्यलाभ होतो असा नियम असला तरी शोक करणे योग्य ण्हटले गेले असते, पण यातून काहीही प्राप्त होते असा अनुभव नाही व कोठे शास्त्राधारही नाही. ज्याअर्थी शोकापासून धर्माचा, बुध्दीचा, शरीराचा, इंद्रियाचा नाश होतो, नेत्रातील तेज नाहीसे होते, घोर दु:ख प्राप्त होऊन परलोकी दुर्गती प्राप्त होते, इतर ऐकणाऱ्यालाही दु:ख होते, अनेक रोगांची उत्पत्ती होते, शक्तीचा ऱ्हास होतो, व्यवहारपरमार्थाचा नाश होतो, धैर्य व ज्ञान इत्यादि नष्ट होतात, त्याअर्थी अनेक प्रकारच्या दु:खाचे कारण जो शोक त्याचा त्याग करणे हेच योग्य आहे. याप्रमाणे तिर्यचगतीत अनेक जन्मापर्यंत उत्पन्न करणआरे इष्टिवयोज आर्त ध्यान कधीही अंत:करणात होऊ देऊ नये.

हा इष्टवियोग पापाचे फल आहे. त्याबद्दल शोक करून काय होणार( यापुढे पापकर्म कसे नाहीसे करता येईल याचा विचार करावयाचा व तसा प्रयत्न करू लागावयाचा म्हणजे पु:न ह्या इष्टवियोगाचे दु:ख प्राप्त होण्याची पाळी येणार नाही. जे इह्या इष्टिवयोगज दु:खाने विव्हळ झाले आहेत त्यांना अशा प्रकारच्या असता कर्माचा बंध होत आहे की, त्यापासून पुढे संख्यात असंख्यात जन्मापर्यंत दु:खाची परिपाटि नाहीशी होणार आहे. जसे प्रत्येकक्षणी आयुष्य नष्ट होत आहे तसे याचा कालाच्या मुखात प्रवेश होत आहे. देहधारण केला असून त्याला मरण प्रपात् झाले नाही अशी गोष्ट अनंतकालात कधी घडून आली नाही व पुढे पण कधी घडणारी नाही. सूर्य चंद्रादिक, देव व पक्षी हे आकाशात विहार करतात, मनुष्य तिर्यचादिक पृथ्वीवर राहतात, मत्स्यकच्छपादि जीव पाण्यात राहतात व काल हा स्वर्गात, नरकात, आकाशआत, पाताळा, जली, स्थली वगैरे सर्वत्र राहात आहे. यापासून कोणाची सुटका होणार आहे( जे दिवस व्यतीत होत आहेत तितके आयुष्याचे मोठेमोठे तुकडे नाहीसे होत आहेत.सागरोपम वर्षे ज्यांचे आयुष्य, अणिमामहिमादिक अष्ट ऋध्दी ज्यांना प्राप्त जालेल्या, हजारो देव ज्यांच्या सेवेला हजर आहेत अशांचा देखील संहार झालेला आहे. मग त्यापुढे मनुष्य **µÖÖ¯ÖÎ´ÖÖÞÖê †Ö¯Ö»µÖÖ** मनात विचार करून इष्टिवयोग प्राप्त झाला असता आर्तध्यान करू नये. इष्टिवयोगापासून उत्पन्न होणाऱ्या आर्तध्यनाला जिंकण्याकरिता काय विचार करावा हे येथवर

सांगितले.	यापुढे रोगजनित आर्तध्यानाच्या स्वरुपाचा विचार करू . शरीरात रोग उत्पन्न झ ााला म्हणजे तो नाहीसा होण्याकरिता परिणामात निरंतर क लेश उत्पन्न होतात, त्याला रोगजनित आर्तध्यान म्हणतात. खोकला, श्वास, ज्व र, वात, पित्त, कफ, उदरशूल, मस्तकशूल, नेत्रशूल, कर्मशूल, दंतशूल, जलोदर, स्फोदर, कोड, खरू ज, गजकर्ण, संगर्हणी, कंठोदर, अतिसार इत्यादि अनेक प्राणघातक रोग शरीरात उत्पन्न होत असतात. त्ापासून भयंकर वेदना होतात. रोगांच्ाया पीडेने श्वासोच्छ्वास करणे देखील त्रासदायक होते. उठता-बसता, निजता अथवा कोणत्याही स्थितीत परिणाम स्थिर राहात नाहीत. अशा प्रसंगी पिरणामात महान दु:खामुळे उत्पन्न झालेल्या पीडेचे चिंतन करणे हे आर्तध्यान होय. ही रोगजनित पीडा इतकी जबरदस्त आहे की ह्याने मोठमोठे योध्ये, महाशूर, वीर अनेक शास्त्रांश्त्रांचा प्रहार सहन करणाऱ्या पुरुषांचे देखील धैर्य नाहीसे झआले आहे. या प्रकारच्ा रोगवेदनाजनित आर्तध्यानाला जिंकण्याचे सामर्थ्य असणे ही फार कठीण गोष्ट आहे. अशा प्रकारची वेदना होत असता आपले परिणाम चंचल न होऊ देणे हे भगवान वीर जिनंद्राला शरण गेल्यानेच प्रपात् होणार आहे. याप्रमाणे जिनेश्वराला अनन्य शरण गेल्याशिवाय दुर्धर वेदना सहन करण्याचे सामर्थ्य प्राप्त होत नाही. म्हणूनच ज्ञानी पुरुष सर्वज्ञ जिनभगवंताला शरण जाऊन याप्रमाणे चिंतन करतात.

((हे आत्मन् ( सध्या तुला या भयंकर असाताकर्माचा उदय प्रपात् झाला आहे. यावेळी तू जर शोक कर लागशील तर तो तुझा शोक व दु:ख कोण नाहीसे करील बरे( असे असूनही तू जर दु:खाने तडफड केलीस तरी वेदना थोडीच तुला सोडणार आहे( करिता यावेळी धैर्य धारण करू न प्रपात झालेले दु:ख तुला भोगले पाहिजे. धैर्य न धरता जरी तू पुष्कळ घाबरू न गेला, तरी ते भोगल्यावाचून सुटका नाही, रोग हा शरीरातून उत्पन्न झालेला आहे. तो फार झाले तर देहाला मारू न टाकील. आत्याचा घात करणार नाही ना ( तुझा स्वभावा ज्ञानदर्शन असून तोअविनाशी आहे. पण ज्याअर्थी तू या देहाच्या फँदात येऊन फसला आहेस त्याअर्थी धैर्य धारण करू न मनातील भीती सोडून दे. संसारात भ्रमण करीत असता असे कोट्यावधी रोग तुला प्राप्त झाले, तू ताडन मारणाचा त्रास नरकात भोगलास, तिर्यचगतीत तुला प्रत्यक्ष घोर दु:ख रोगापासून प्राप्त झाले, हे तू जाणत आहेस. इतर सर्वापासून पळून जाता येईल पण कर्मापासून पळता येणार नाही कारण कर्ममय शरीराने तुझ्या प्रत्येक प्रदेशात अनंतकर्म परमाणू बांधून त्याला आपल्या स्वाधीन ठेवलेआहे. ते कर्म तुला कसे पळू देईल( दुसरे असे की, कर्म हे मरण प्राप्त करू न दिल्याशिवय सोडणारे नाही. देह सुटेल पण कर्म हेतू दुसरा देह धारण केला की तुझ्या मागे येणारच. रोग प्राप्त झाल्यावेळी जै धैर्य धारण करतात, त्याच्या कर्माची निर्जरा होते. म्हणून तू ते धारण करणे योग्य आहे. पुन: असा विचार कर की, मुनीश्वर हे उन्हाळ्यात

उष्णतेची व हिवाळ्यात थंडीची वेदना कर्म जिंकण्याकरिता सहन करण्यात मोठ्या उत्साहाने तयार होतात. तुला कर्माचा उदय प्राप्त झाला आहे. म्हणून धैर्य धरू न जिंकण्यास तयार हो. दुसरे, असे पाहा की कित्येक माणसे निर्धन असून एकटीस असतात. त्यांना राहण्यास जागा व पोटास अन्न मिळत नसते. कोणी त्यांची काळजी घेणारा अथवा साहाय्य देणाराही नसतो. शरीरात वरचेवर रोग उत्पन्न होत असतात. त्यावेळी कोणी तोंडात पाणी घालण्यात देखील जवळ नसेत. त्याप्रसंगी त्याला जे दु:ख होत असते ते सांगता येण्यासारखे नाही. याप्रमाणे दु:ख भोगणारा अज्ञानी मनुष्य आपण निराधार आहोत असे जाणून सर्व दु:ख सहन करतो ना( तुला तर राहण्यास स्वत:ची जागा, खायला षड्रस अन्न, रोगावर औषध, सेवेसाठी नौकर माणसे, बायको, मुले मित्र वगैरे सर्व सामग्री उपलब्ध आहे. अशा स्थितीत भय सोडून शांतभावाने प्राप्त झालेली वेदना तू सहन केली पाहिजे. धर्म धारण करण्याचे हेच फल आहे. अरे, ज्याला कोणत्याही प्रकारचे साहाय्य नाही ते धैर्य धारण करतात. तुला तर सर्व प्रकारची अनुकूलता आहे. तू जैन धर्म धारण करू न कर्मोदय अप्रतिबध्द आहे असे जाणलेले आहेस. अशा स्थीत तू असे रोगवेदनेने घाबरू न जावे काय( रोगापासून उत्पन्न होणार्या भयंकर वेदना सहन करीत आजपोवतो किती तरी कैदी मरण पावले आहेत( पुशुयोनीतही याचप्रमाणे रोग, वेदना सहन करू न किती तरी मरतात( रोग झाल्यामुळे निर्जन वनात, चिखलात, उन्हात, थंडीत निराश्रयामुळे राहणे व कोट्यावधी किड्यांकडून भक्षिले जात असता अत्यंत घोर वेदना सहन करणे वगैरे अनेक दु:खे संसारात प्राणिमात्रांा भोगावी लागतात. संसार केवळ ददु:खांनीच भरलवेला आहे. सारांश, सर्व प्रकाराचे रोग हे शरीराला प्राप्त होणारच. पण त्या प्रसंगी जिनधर्माला शरण जाऊन जिनेंद्रवचनाचेस्मरण करणे हेच सर्व प्रकारच्या रोगावर व जन्ममरणाच्या रोगावर अप्रतिम औषध आहे. याशिवाय इतर औषधोपचार साताकर्माच्या उदयाच्या साहाय्याने व असाताकर्माचा उदय मंद होण्याने उपकारक होत असतात. असाताकर्माचा प्रबल उदय असला तर त्यावेळी केलेले अनेक उपचार व्यर्थ होतात म्हणून अशुभकर्माचा नाश करणारा परम शांत भाव धारण करणे हेच श्रेष्ठ आहे. (( याप्रमाणए रोगजनित आर्तध्यानाला जिंकण्याची भावना वर्णिली.

यापुढे निदान नामक चौथ्या आर्तध्यानाचे स्वरू प थोड्यात सांगतात. देवादिकांचे भोगोपभोग आपणांस प्राप्त व्हावे, अपसरेचे नृत्य वगैरे पाहण्यास मिळावे, आपले नशीब चांगले निघावे, आपले स्वरू प सुंदर असावे, अखंड ऐश्वर्यावने युक्त असे साम्राज्यपदाचे वैभव प्राप्त व्हावे, सुखोपभोगाकरिता रम्य गृह, राजवाडा, बंगला वगैरे असावा. सुस्वरू पर स्त्रीच्या अंगाचा आपणास सदैव स्पर्श होत असावा, शय्या, आसन, वस्त्रालंकार व सुगंधित व षड्रस संयुक्त

इच्छाभोजन प्राप्त व्हावे, अनेक सुरम्यस्थळी क्रीडा व विहार करावा, आपले जे वैरी असतील त्यांचा नाश व्हावा, आपल्या इच्छेप्रमाणे आपणांस सदैव विभूती प्राप्त होत रहावी, आपणाला लोकांनी थोर म्हणावे, आपली आज्ञा पालन करणाऱ्याचा विजय व्हावा व आज्ञा न पाळणाऱ्याचा तिरस्कौर व्हावा, गर्व उत्पन्न करणारी व सर्व पंडितांचा तिरस्कार करणारी विद्या प्राप्त व्हावी, राजा आपल्या स्वाधीन असावा, आपल्या आजीविकेची नेहमी वृध्दी होत जावी, इतर कुटुंबाच्या संपत्तीचा नाश व्हावा, आपल्या कुटुंबात त धनाचा लाभ व्हावा, आपण दीर्घकाल जागावे, आपण बोलू ते घडून यावे, आपण केलेले कपट व खोटे काम छपून रहावे, इतर आपणाहून कमी आहेत असे मानले जावे, आपली सर्व लोकात उच्चता असावी, सर्व भोगआपणालाच प्राप्त व्हावे, निरोगी शरीर व सुंदर स्वरूप, अचाट संपत्ती, आज्ञाधारी पुत्र, चतुर सेवक वगैरे सर्व भिवष्यत्काली आपणांस प्राप्त व्हावे अशी इच्छा करणे याला निदान नामक आर्तध्यान म्हणतात. हे संसारपिरभ्रमणाचे कारण पुण्याचा नाश करणारे आहेम्हणून निदान कधीही करू नये.

इच्छा ही पापबंधाला कारण आहे. भोगांची अभिलाषा आणि आपला अभिमान पुष्ट होण्याची इच्छा यापासून संचय केलेल्या पुण्याचा नाश होतो. निर्वाछक परिणाम पुण्यबंधालाकारण आहेत. आपली उच्चता व्हावी व आपणाला विषयांची प्राप्ती व्हावी असा लोभ तीव्र कषायी व पर्यायबुध्दी पुरुषाशिवाय इतरांना होत नाही. विषय व अभिमान तरी किती दिवस टिकणार आहे( जगात आजप४यंत अनंत रुपुष संपत्तिवान्, बलवान्, बिध्दवान्, रूपवान्, वगैरे होऊन गेले. त्यांचा आज मागूमूसही राहिलेला नाही. इतके दिवस तुम्ही भोग भोगीत आहात. त्यांनी तुमचे काय कल्याण केले( हे भाग कधीही तृप्ती होऊ न देणारे आहेत. हे दुर्गतीला वनेऊन पोहचिवणार आहेत, हे प्राप्त व्हावे अशी िछा केल्याने कधीही प्राप्त न होणारे आहेत. असंख्यात जीव हे प्राप्त व्हावे असा इच्छारूप अग्नीने रात्रंदिवस जळत आहेत. मरणाची वेळ जवळ आली तरी इच्छा उत्पन्न होत असतेच. सर्व जग या इच्छेने होरपळून जात आहे. जगात जीवाला एव्ढी जबरदस्त तृष्णा लागलेली आहे की, त्यात त्रलोक्यच्या राज्याची आहुती दिली तरी ती तृप्त होणार नाही. त्रैलोक्याचे संपूर्ण राज्य वाटून देण्याचे ठरविले तरी ते कोणाच्या किती वाट्यास येईल( राखेसारख्या या धनसंपदेपासून आत्म्याला काय साधावयाचे आहे( संपत्ती, परिग्रह व अभिमान हेच दु:ख उत्पन्न करणारे आहेत, म्हणून यांच्या नादी न लागता आपल्या अविनाशी ज्ञानसंपदेला प्राप्त करून गेण्याचा प्रयत्न करावा.

संतोषासारखे सुख नाही व संतोषासारखे तप नाही. जे प्राप्त विषयामधये संतोष ठेऊन निर्वाछक होऊन राहण्याचा यत्न करतात त्यांना मोठे तपश्रचण घडते व त्यांच्या कर्माची निर्जरा होते. हे असो, पण नेहमी संपत्तीसाठी तळमळ करणाऱ्याला तरी काय प्राप्त होते( अनंतानंत जीव

विषयकषायाच्या प्राप्तीची इच्छा करीत दुर्गतीला जातात. याकरिता जर सत्यार्थ जिनेंद्रधर्रम तुमच्या अंत:करणात बिंबला असेल तर गत-वस्तूचे चिंतन करू नका. भिवष्यत्काली अमुक प्राप् व्हावे अशी इच्छा पण करू नका व वर्तमानकाली आपल्या कर्माचा शुभाशिुभ रस जो उदयाला आला असेल त्याविषयी रागद्वेष न करता तो शांत चित्ताने सहन करा. हा शुपभाशुभाचा संयोग काही तुमचा स्वभाव नव्हे. हा कर्माचा उदय आहे. असे जाणून पुढील इच्छेचा अभाव करून निदान नामक आर्तकध्यानाला जिंका. याप्रमाणे येथवर ४ प्रकारच्या आर्तध्यानाचे स्वरूप सांगितले.

ही आर्तध्याने सहाव्या गुणस्थानापर्यंत उत्पन्न होतात. निदान आर्तध्यान पांचव्या गुणस्थानापर्यंतच उत्पन्न होते. ते सहाव्या गुणस्थानात होत नाही. आर्तध्यान कृष्ण, नील, कपोत या तीन अशुभलेश्यांच्या प्रभावाने उत्पन्न होते. हे आर्तधअयान पापरूपी अग्नीला वाढिवण्यास इंधनासारखे आहे. हे अनादिकालापासून असलेल्या अशुभ संस्कारापासून काहीही प्रयत्न केल्याशिवाय उत्पन्न होते. याचे फल निरंतर अनंत दु:ख प्राप्त होऊन तिर्यंचयोनीमध्ये परिभ्रमण करणे हे आहे. हा क्षायोपशमिक भाव आहे. याचा काल अंतर्मुहूर्त आहे. ज्यांच्या अंत:करणात आर्तध्यान असते त्यांच्या बाह्य शरीरावर शोक, शंका, भय प्रमाद, कलह, चिंता, भ्रान्ती, उन्माद, निद्रा, अंगात जडपणा, भ्रम, मूर्च्छा, वगैरे चिन्हे प्रगट होतात.

रौद्रध्यान

यापुढे चार प्रकारचे रौद्रध्यान आहे, तेही सोडून दिले पाहिजे. हिंसानंद, मृषानंद, चौर्यानंद आणि परिग्रहानंद असे चार प्रकारचे रौद्रध्यान आहे. यातून प्रथमत: हिंसानंदाचे स्वरूप असे आहे.

अनेक प्राण्यांचा घात आपण स्वत: करणे अथवा इतरांकडून करविणे व असे झाले असता अंत:करणात अतिशय आनंद प्राप्त होणे, याला सिंहानंद दौद्रध्यान म्हणतात. ज्ला हिंसेची कारणे, उत्पन्न झाली असता आनंदहोतो.वनकटाई, बाग-बगीच्यांची लागवड, जमीन खोदिवणे, सडका बांधिवणे व त्या दुरुस्त करणे वगैरे कृत्यात आनंद वाटतो, ज्याला पाण्याची गिरणी, तलाव, विहिरी, पाट, नदी, नाले वैगेरे खोदवून तयार करण्यास नेहमी अतिशय संतोष वाटतो, ज्याला गाव अथवा घर जाळून टाकण्यात, पर्वत फोडण्यात , युध्द होण्यात, परद्रव्याचा नाश होण्यात, दारूच्या व्यसनात, दरोड्याच्ाय कृत्यात व लुटालुटीत अनुराग वाटतो, ज्याला आकाशातील व पृथ्वीवरील पशुपक्ष्ांची शिकार करण्यात व पशूंची हत्या करण्यात, अनेक

प्राण्यांना पिंजऱ्यांत कोंडून ठेवण्यात आनंद वाटतो, याचप्रमाणे इतर अनेक हिंसेच्या गोष्टीत ज्याला आनंद उत्पन्न होतो, त्या सर्व क्रियांना हिंसानंद रौद्रध्यान म्हणावयाचे.

रौद्रध्यान करणाऱ्यांचा नेहमी निर्दय स्वभाव असतो, त्यात सदैव क्रोध भरलेला असतो. त्याची बुध्दी गर्वाने उध्दत झालेली असून सदैव पापकिर्रंचो चिंतन करण्ात गुंतलेली असते. तो परलोक, धर्र्म, अधर्म यापैकी कशालाही मानत नाही. रोद्रध्यानी पुरुषाची पापकर्मात अतिशय निपुणता असल्याकारणाने अनेक प्रकारच्या कुबुध्दी अगोदरच त्यापुढे हात जोडून उभ्या असतात. रौद्रध्यानी पापोपदेश देण्यात, नास्तिक मत स्थापन करण्यात( हिंसेची कार्ये अतिशय प्रीतीने घडवून आणण्यात फार निपुण असतो. असा पुरुषांच्या संगतीमध्ये रात्रंदिवस राहणे हे देखील हिंसानंदरौद्रध्यान ओ. रौद्रध्यानी पुरुष ज्यापासून आपला कोणताच अभिप्राय सिध्द होत नाही,त्या विषयी नेहमी खाली लिहिल्याप्रमाणे चिंता करीत असतो.

((याचा कोणत्या रीतीने घात करावा( याचे गावात कोणाशी वैर असले बरे( याचा नाश करण्यास कोण आनंदाने तयार होईल( बेमालून रीतीने याचा घात करण्यात कोण प्रवीण असेल( याचा किती दिवसात नाश करता येईल( याला काय उपाय योजावा( खरोखर माझ्या इच्छेप्रमाणे जर याचा नाश होईल तर ब्राह्मणांना इच्छाभोजन देईन, **†Ö¯Ö»µÖÖ ¿Ö¡Öæ“ÖÖ ®ÖÖ¿Ö ÆÖêÞµÖÖÖÛú×¸ŸÖÖ ¯ÖîÃÖê ÜÖ“ÖæÔ®Ö •ÖÖ¯µÖ Ûú¸×¾ÖÞÖê, ¤ãÝÖÖÔ¯ÖÖš Ûú×¸¾ÖÞÖê, ¿´ÖÁÖæ ®Ö Ûú¸×¾ÖÞÖê, ›ÖêÛúß¾Ö¸ÛêúÃÖ ¾ÖÖ×œ¾ÖÞÖê ¾Ö ¸Ö¡ÖÓ×¤¾ÖÃÖ** विचारात तळमळ करणे वगैरे क्रियाचा हिंसानंदात अंतर्रभाव होतो. पाण्यातील, जमिनीवरचे आकाशातले वगैरे अनेक प्रकारचे त्रसजीव मारण्याविषयी, त्यांना बांधून टाकण्यात व कोंडून टाकण्यात ज्याचा आटोकाट प्रर्यत्न चालेलेला व जीवांचे नख, नेत्र चर्म वगैरे उपटून कढ्ण्यात व त्यांचे परस्पर युध्द करिवण्यात ज्याला अतिशय प्रेम, त्याला हिंसानंद रौद्रध्यान आहे असे समजावे. अम्म याची जीत, अम्म याची हार, अमक्याचा तिरस्कार, अम्म याचे मरण अम्म याचा द्रव्यनाश, अम्म याची स्त्री, पुत्र, मरण, वियोग वगैरे सर्व प्राप्त होवो अशा प्रकारचे चिंतन करणे आणि वरील सर्व गोष्टी घडून येत असता अतिशय आनंद मानणे यालाही हिंसानंद रोद्रध्यान म्हणतात. पुन:मनात असा विचार आणावयाचा की, (( काय करावे मला इतकी शम्ती नाही व कोणा जबरदस्ताचे सहय्यही नाही. असा कोणता दिवस उगवेल की त्यादिवशी मी माझ्या पूर्व शत्रूला मारू शकेन, कदाचित् इहलोकी माझ्या शत्रूचा नाश करण्याचे सामर्थ्य मला प्राप्त न झाले तरी परलोकी याचा पिच्छा पुरवून सूड घेईन((. याप्रमाणे मनात

नेहमी कोणावर तरी अपकार करण्याची बुध्दी ठेवावयाची व त्याप्रमाणे कोणाला विघ्न प्राप्त झाले, कोणाची बायको अथवा मुलगा वारला किंवा कोणाचा जगात अपमान झाला की आपण हर्षित व्हावयाचे, हे सर्व हिंसानंद रौद्रध्यान आहे. हे व याचप्रकारचे हिंसेचे अनेक विकल्प बाळगेणे त्या सर्वांचा हिंसानंदात अंतर्भाव होतो असे जाणून याचा त्याग करणे आवश्यक आहे.

आता हिंसानंद कोणाला होतो हे त्याच्या बाह्य चिन्हावरून सहज समजून येते. ती चिन्हे अशी-हिंसेची उपकरणेतरवार, सुरू, कट्यार वगैरे शस्त्रे ग्रहण करणे, त्या शस्त्रांनी मारण्याचा, विदारण करण्याचा, कोणाचा दावा धरून घात करण्याचा विचार करणे, याचप्रमाणे मारण्याच्या कलेत निपुणता संपादन करणे, हिंसा करणारे पशू आपल्या जवळ पाळणे, कुत्रा, वाघ वगैरे हिंसक जीव शिकारीकरिता जवळ ठेवणे वगैरे अनेक क्रिया हिंसानंदाची बाह्य चिन्हे आहेत.

यापुढे मृषानंद नामक रौद्रध्यानाच्या दुसऱ्या भेदाचे स्वरूप सांगतो. मृषानंद म्हणे खोटे बोलण्यात आनंद मानणे अथवा असत्याची कल्पना करण्यात निपुण असणे. मायाजालाने लोकांना फसवून त्यापासून पैसे काढावयाचे, एखाद्या विद्येचा, रसायानाचा मंत्रतंत्राचा, व्यंतराचा किंवा इंद्रजलाचा असा चमत्कार दाखवावयाचा की, सर्व लोक स्वत्व विंसरून आपल्या स्वाधीन व्हावे. असे गोड बोलवयाचे की त्याला भुलून लोक वश व्हावयाचेच, असे केले तर आपल्या जिहवेचे खरे चीज, अशी त्याची ठाम समजूत असावयाची. पापी लोकांना परलोकाचे मुळीच भय नसेत. म्हणून ते आपल्या पांडित्याच्या जोरावर अनेक कल्पित शास्त्रे रचून जगाला विपरीत धर्मस्वरूप भासवून, त्यांना यज्ञायागादिकात धर्म घडतो, रागद्वेषी देव-देवतेपासून इच्छित कार्‍रये शेवटास जातात, देवदेवता मद्यमांस भक्षण करून संतुष्ट होतात, देवीला बकरा, रेडा वगारे जीव बळी दिल्याने ती तृप्त होते व आपली इच्छित कार्ये पूर्ण होऊन वैऱ्याचा नाशहोतो, राज्यलक्ष्मीही याच कारणांनी आपल्या जवळ स्थिर राहते, याप्रमाणे अनेक कल्पित व खोट्या गोष्टी शास्त्रात लिहून परिग्रह व आरंभादि पापकार्यात प्रवृत्त करतात. याचप्रमाणे देवतेला प्रसन्न करणारा जो असेल तोच खरा मोक्षामार्गी असे प्रतिपादन करतात. प्रीती, राग, द्वेष, काम या सर्वांना वाढविणाऱ्या स्त्रीकथा, राजकथा, भोजनकथा व देशकथा बोलण्यात आनंद मानावयाचा. लोकांचे खरे खोटे दोष सांगण्यात व आपली बढाई करण्यात हर्ष वाटावयाचा.हे सर्व मृषानंद रौद्रध्यान आहे. असत्याच्या सामर्थ्याने खोट्याला खरे व खऱ्याला खोटे, निर्दोषाला दोषी, दोषी असेल त्याला निर्दोषी म्हणावयाचे. याप्रमाणे (हे सर्व लोक मूर्ख आहेत, यांना ज्ञान अथवा विचार काहीच नाही. यांना आपल्या कर्तृत्वाने विपरीत व अनर्थकारी कार्याठायी प्रवर्तन करवून भ्रष्ट करून टाकू व यांची सर्व धनसंपत्ती आपण हिरावून येई( असे विचार व खोटे

संकल्प सदैव मनात ठेवणे हे नरकगतीला सारण अशा मृषानंदाचे कार्य आहे, असे जाणून यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

तिसऱ्या चौर्यानंद नामक रौद्रध्यानाचे स्वरू प असे ाहे. चौर्यानंद म्हणजे चौरी करण्याचा उपदेशकरण्यात नैपुण्य संपादन करू न आनंद मानणे. याच प्रमाणे परधन-हरण करण्याकरिता रात्रंदिवस विचार करीत राहून त्याप्रमाणे कोठून तरी द्रव्य चोरू न आणले असता अतिशय हर्ष मानणे( अथवा दुसऱ्या कोणी चौरू न आणलेले द्रव पाहून असा विचार मनात आणणे की, (याला एवे मोठे परधन कोठून मिळाले( याचप्रमाणे मला एखाद्याचे डबोले कधी हाती येईल(( याला काय उपाय करावा( कोणाचे साहाय्य ÛúÖêšê ¯Ö››Öê»Öê, ×¾ÖÃÖ¸»Öê»Öê,ÝÖÖ››Öê»Öê ¬Ö®Ö †Ö¯Ö»µÖÖ ÆÖŸÖß »ÖÖÝÖê»Ö †ÃÖê ¯ÖãÞµÖ †Ö¯Ö»µÖÖ»ÖÖ Ûêú¾ÆÖ ˆ¤µÖÖ»ÖÖ µÖê‡Ô»Ö( ¤ãÃÖ¸Ö ÛúÖêÞÖß “ÖÖî¸ß Ûúºþ®Ö †Ö¯ÖÞÖÖ»ÖÖ ¤ê‰ú®Ö •ÖÖ‡Ô»Ö, †£ÖÖ¾Ö चौरी माल थोड्या किंमतीत आपणाला मिळेल, बहुमोल रत्नसुवर्म वगैरे कोणी मला चुकून देऊन जाईल तर फार चांगले. अथवा एखाद्या अज्ञान मुलाने बहुमूल्य वस्तू दिली तर फार मजा होईल(( हे व अशाच प्रकारचे विचार मनात घोविणे हे चौर्यानंद रौद्रध्यान आहे.( एखाद्या बलिष्ठ सैन्याचे सहाय्य घेऊन अनुक ठिकाणी संचित केलेले द्रव्य अनेक उपायांनी काबीज करू न घेऊन अथवा एखादे कपट ल्ढ बून वाक्चातुर्याने व पुरुषार्थाने जीवावर उदार होून एखाद्याचा घात करू न त्याचे धन ग्रहण करू ( याप्रमाणे अनेक विचार मनात आणणेहे नरकगतीचे कारण असे चौर्यानंद रौद्रध्यान आहे. याचा अवश्य त्याग केला पाहिजे.

परिग्रहानंद रैाद्रध्यानाच्या स्वरू पाचा विचार करू . परिग्रह म्हणजे धनधान्य, दासीदास, कुप्य, भांड वैगेर पदार्थ. ते वृध्दिंगत झाले असता आनंद मानणे आयाला परिग्रहानंद म्हणतात. याचे सदैवे चिंतन करीत राहणे रौद्रध्यानहोय इंद्रियांच्या अथवा अभिमानौच्या वश झाल्यामुळे अशा तऱ्हेचा विचार येतो (आपणाला राहण्याला असे घर प्राप्त व्हावेकी, ज्या घराभोवती रमणीय बाग असून चौहैांकडून स्वच्छ हवा व उजेड यांचा पुरवठा होत आहे.ते अनेक कुशलकारागिरांनी आपल्या चातुर्यानेबांधलेलेअसून मनोहर अशा चित्रांनी रंगिवलेले असावे, त्यात रुपेरी चौफुला झोके घेण्याकरित लटकविलेला असून घराची एकंदर अंतर्भाह्य रचना इतकी सुंदर असावी की, ती पाहाताच लोकांना आश्चर्य उत्पन्न व्हावे. असे घर प्राप्त झाल्यानंतर त्याच्ाय सभोवती मी सुंदर पुष्पांचा बगीचा लावीन व झाडांना टवटवी आणण्याकरिता जलविहार तयार करीन, तसेच बागेला पाण्याचा पुरवठा होण्याकरिता विहिरी खणीन, जलक्रीडेकरिता अनेक सुंदर लहान लहान तलाव

बांधवीन, कामक्रीडेचे स्थान, भोजनशाल, नाटकगृह वगैरे अनेक मनाला रमविणारी स्थाने त्याजागी निर्माण करून ती जागा म्हणजे दुसरे नंदनवन बनवीन. असा रम्य बागेतून माळ्यांनी अनेक ऋतूंची फुले व फळे आणून मला नजरकरावी,म्हणजे मला फार समाधान वाटेल.माझ्यासारखी विभूती, घर, दार, ऐश्वर्य वैगेर इतर कोणालाही प्राप्त झालेली नाही अशी स्थिती जेव्हामला प्राप्त होईल तोच दिवस माझ्या भाग्याचा समजेन(.

मला असे सुंदर स्वरूप प्राप्त व्हावे की, त्याकडे हजारो स्त्री-पुरुषांचे डोळे नेहमी लागेल असावे. माझ्या अगांवरील अलंकार, हिरा माणिक, मोती पाचू वगैरे अमूल्य नवरत्नांचे असावेत व या अलंकाराला शोभतील अशी उत्कृष्ट वैरीक मौल्यवान रेशमी जरीची वस्त्रे असावीत. घरात याच डौलालाशोभतील अशी चांदी सोन्याची अनेक प्रकारची उपकरणे असावीत. रुपलावण्य वकोमलतेने अप्सरेला देखील जिंकणारी शीलवती, प्रियभाषिण स्त्री असावी( आज्ञाधारी, शूर, वीर, धैर्यवान, विद्वान किर्तिमान व विनयशील पुत्र असावा,आपल्या मनाप्रमाणे कामकरून देणारे चतुर व स्वामिभक्ति तपरायण असे सेवक असावेत. इतके सर्व प्राप्त झाल्यानंतर आपणासारखे वैभव दुसऱ्या कोणालाही नाही हे पाहून व त्याचेच चिंतन करण्यात आनंद माणणे वजसजशी धन संपत्ती वाढत जाईल तसतसा अधिकआनंद मानणे हे सर्व परिग्रहानंदाचे लक्षण आहे.

अथवा आपल्या घरात चांदी, सोने कांसे, पितळ, लोखंड, तांबे, पाषाण, लाकूड, कांच चिनीमाती वैगेरेची अनेक प्रकारची भांडी अथवा वस्त्रप्रावरणादिक वगैरे कोणताही परिग्रह वाढलेला पाहून आनंदित होणे अतवा यापैकी कोणताही परिग्रह कोणी आपल्या घरी विसरून गेलेअसता तो आपणांस प्राप्त झाला म्हणून आनंद मानणे व जसजसा परिग्रह वाढेल तसती आपली जगातउच्चता वाढेल अशी कल्पना करणे, हे सर्व परिग्रहानंद रौद्रध्यान आहे. याशिवय इतर अनेक गोष्टींचाही यात समावेश करताय येईल. जसे अमुकाची जमीन अथवा शेतवाडी आपणांस प्राप्त व्हावी( अमुकाची अमुक धंद्यावर उपजीविका होत आहे, तो धंदा आपणास प्राप्त झाला तर बरे( याला आता यापुढे काही करावयाचे नाही त्याअर्थी तो आता मरेल तर बरे( याच्या मरणामुळे माझी उपजीविका वाढेल व सर्व संपत्तीची मालकी प्राप्त होील, अमुकायीची पोरेबाळे, स्त्रिया वगैरे सर्व असमर्थ आहेत, आता त्यांनवा काय विचारावयाचे आहे( त्यांचा तिरस्कार करून मीच एकटा त्या संपत्तीचा उपभोगघेऊन, हे व याचा प्रकाराचे चिंतन सदैव मनात करीत राहणे हे परिग्रहानंदात मोडले जाते याचप्रमाणे दुसऱ्याचे धन, राज्य जमीनजुमला, आजीविका सुंदर परिहग्रह, लावण्यावती स्त्री, आभूषणे, हत्ती घोडे वगैरे बळजबरीने हिसकावून घेण्यात, बुध्दीचा, शरीराचा, मित्राचा वगैरे सर्वांचा कपटकृती करण्यात अथवा खोटी क्रिया करण्यात मोठा उपयोग आहे. म्हणून हर प्रयत्नाने त्यांचे सहाय्या म्हणिवण्यात आनंद मानणे हेही परिग्रहानंद रौद्रध्यान आहे.